# दैनिक महावृत्त

E-Mail:dainikmhavratt@gmail.com

संपादक-अशोक हनवते.मो-9421094991,7264079990



संजय साबळे 8208137064 / 9921661173
विकी साबळे 8208068315
प्रिती नर्सरी अँन्ड लॉन सप्लायर्स
आमच्याकडे सर्व प्रकारचे शोभीवंत इनडोअर आऊटडोअर प्लॅन्टस तसेच लॉन मिळेल
पुणे - सोलापुर रोड, काळभोर लॉन्सच्यापाठीमागे, कवडीगाव रोड, ता. हवेली, जि. पुणे.



लातूर वर्ष ५ वे अंक ७० गुरूवार दि.१८ सप्टेंबर २०२५ पृष्ठे ४ स्वागत मूल्य २ रू.


# लातूर जिल्ह्यात ओला दुष्काळ जाहीर करा

## माजी मंत्री, आ. अमित देशमुख यांची शासनाकडे मागणी

लातूर /प्रतिनिधी :- गेल्या काही दिवसांपासून सुरू असलेल्या अतिवृष्टी आणि पुरामुळे शेतीचे प्रचंड नुकसान झाले असून, यामुळे लातूर जिल्ह्यात 'ओल्या दुष्काळाची' स्थिती निर्माण झाली आहे. या गंभीर परिस्थितीवर तातडीने उपाययोजना करण्यासाठी शासनाकडे 'ओला दुष्काळ' जाहीर करण्याची मागणी राज्याचे माजी वैद्यकीय शिक्षण व सांस्कृतिक कार्यमंत्री तसेच लातूर जिल्ह्याचे माजी पालकमंत्री, आमदार अमित विलासराव देशमुख यांनी केली आहे. मागील १५-२० दिवसांपासून लातूर जिल्हा, मराठवाडा आणि संपूर्ण महाराष्ट्रात अतिवृष्टी आणि पुरामुळे शेतीचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. या पार्श्वभूमीवर राज्याचे माजी वैद्यकीय शिक्षण व सांस्कृतिक कार्यमंत्री तसेच लातूर जिल्ह्याचे माजी पालकमंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांनी आज, बुधवार, १७ सप्टेंबर रोजी खासदार डॉ. शिवाजी काळगे आणि जिल्हा बँकेचे अध्यक्ष तथा माजी आमदार धीरज देशमुख यांच्यासह लातूर जिल्हा काँग्रेसच्या पदाधिकाऱ्यांसमवेत आढावा बैठक घेतली.

शासनाकडे भरीव मदतीची मागणी:

लातूर येथील काँग्रेस भवनमध्ये झालेल्या या बैठकीत आमदार अमित विलासराव देशमुख यांनी जिल्हा काँग्रेसच्या पदाधिकाऱ्यांनी ठीक ठिकाणी जाऊन घेतलेल्या नुकसानीच्या माहितीचा विस्तृत आढावा घेतला. आढावा बैठकीनंतर आयोजित पत्रकार परिषदेत आमदार अमित देशमुख यांनी शासनाने लातूर जिल्ह्यात तातडीने ओला दुष्काळ जाहीर करावा, तसेच शेतकरी, शेतमजूर आणि आपत्तीग्रस्तांना भरीव मदत देऊन त्यांना धीर द्यावा अशी मागणी केली. या संदर्भात जिल्ह्याचे पालकमंत्री छत्रपती शिवेंद्रसिंहराजे भोसले यांना सविस्तर निवेदन देणार असलयाचे सांगीतले. लातूर जिल्हयातील गंभीर परिस्थितीचा विचार करून, संपूर्ण लातूर जिल्ह्याला ओला दुष्काळ जाहीर करून सरसकट मदतीच्या उपाययोजना त्वरित राबवाव्यात, वीज पडून किंवा पुरात वाहून मृत्यू झालेल्या व्यक्तींच्या कुटुंबीयांना १० लाख रुपयांची मदत द्यावी, वाहून गेलेल्या प्रत्येक पशुधनासाठी १ लाख रुपयांची मदत द्यावी, नदीकाठच्या वाहून गेलेल्या जमिनी शासनाच्या खर्चाने पूर्ववत करून द्याव्यात, नदीकाठी वाहून गेलेल्या पिकांच्या नुकसानीसाठी प्रति एकर २ लाख रुपयांची मदत द्यावी, फळबागांच्या नुकसानीसाठी प्रति एकर २ लाख रुपयांची नुकसान भरपाई द्यावी, बागायती जमिनीसाठी प्रति एकर १ लाख रुपये तर कोरडवाहू जमिनीसाठी ५० हजार रुपयांची मदत द्यावी, वाहून गेलेल्या विद्युत मोटारी, ट्रॅक्टर आणि शेती अवजारांचे पंचनामे करून त्यांची भरपाई द्यावी, उदगीर तालुक्यातील बोरगाव या आपत्तीग्रस्त गावाचे तात्काळ पुनर्वसन करावे, या परिस्थितीत तातडीने लक्ष घालून लातूर जिल्ह्याला संकटातून बाहेर काढावे आदी मागण्या आपण शासनाकडे करणार आहोत असे सांगीतले. शासनाकडून अपेक्षित मदत मिळेपर्यंत विधिमंडळ आणि संसदेत पाठपुरावा केला जाईल, प्रसंगी यासाठी आंदोलन करावे लागले तरी ते केले जाईल, असे त्यांनी ठामपणे सांगितले. यावेळी लातूर जिल्हा काँग्रेसचे अध्यक्ष अभय साळुंके, लातूर शहर जिल्हा काँग्रेसचे अध्यक्ष ड. किरण जाधव, ड. समद पटेल, माजी जिल्हाध्यक्ष श्रीशैल उटगे, सौ. विदया पाटील, सौ.शिला पाटील, अमर खानापूरे, ड.कल्याण पाटील, डॉ. दिनेश नवगिरे, व्हा. चेअरमन प्रमोद जाधव, प्रवीण पाटील, सर्जेराव मोरे, सुभाष घोडके, विजय देशमुख, एन.आर. पाटील, दगडूआप्पा मिटकरी, प्रविण सुर्यवंशी, लक्ष्मण कांबळे, विजयकुमार पाटील, नारायण लोखंडे, गणपतराव बाजुळगे, इम्रान सय्यद, रमाकांत गडदे, फारुख शेख, प्रवीण कांबळे, मारुती पांडे, सुरेश चव्हाण, अजित माने, सहदेव मस्के, राम स्वामी, कैलास कांबळे, सचिन सूर्यवंशी, सचिन पाटील, संजय ओव्हाळ आदी उपस्थित होते.




## भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या ७५ फुटी स्मारकाचे काम तात्काळ चालू करण्याची व्ही एस पँथर्सची पालकमंत्र्याकडे मागणी

लातूर : व्ही एस पँथर्स युवा संघटनेच्या वतीने आज मराठवाडा मुक्ती संग्राम दिनानिमित्त शासकीय विश्रामगृह या ठिकाणी भेट घेऊन डॉ बाबासाहेब आंबेडकर पार्क येथील भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या ७५ फुटी स्मारकाचे काम तात्काळ चालू करण्यात यावे यासाठी निवेदन देण्यात आले यापूर्वीही मुख्यमंत्री महोदयाच्या दौऱ्यामध्ये निवेदन देण्यात आले होते . अशी माहिती पालक मंत्र्यांना देण्यात आली यावेळी पालकमंत्री महोदयांनी लवकरात लवकर निर्णय घेण्याचे आश्वासन दिले यावेळी जिल्हाध्यक्ष शरद किनीकर विद्यार्थी आघाडी जिल्हाध्यक्ष स्वप्निल कांबळे जिल्हा उपाध्यक्ष आबासाहेब गायकवाड ग्रुप जिल्हाध्यक्ष अजय सूर्यवंशी सह किशोर सावळे,प्रदीप गायकवाड ,पदाधिकारी उपस्थित होते.



## कॉक्सिटच्या दोघी गुणवत्ता यादीत

लातूर : - बीएस्सी तृतीय वर्षाच्या परीक्षेत येथील जैव तंत्रज्ञान विभागात कॉक्सिटच्या दोन विद्यार्थिनी वि द्यापीठात प्रथम व द्वितीय आल्या आहेत. रॉयल एज्युकेशन सोसायटीचे संस्थापक डॉ. एम. आर. पाटील यांनी त्यांचा सत्कार केला. महाविद्यालयाच्या बीएस्सी जैव तंत्रज्ञान विभागात तृतीय वर्षातील नाजीया युसूफ शेख हिने ८५.९ टक्के गुण घेत विद्यापीठात सर्वप्रथम आली आहे. तर अक्षता धर्मराज बिरादार हिने ८४.३४ टक्के गुण घेत विद्यापीठात द्वितीय क्रमांक पटकावला आहे. या यशाबद्दल रॉयल एज्युकेशन सोसायटीचे संस्थापक डॉ. एम. आर. पाटील यांच्या हस्ते नाजीया शेख व अक्षता बिरादार या दोघींचा सत्कार करण्यात आला. यावेळी कॉक्सिटचे प्राचार्य डॉ. व्ही. ए. जाधव, उपप्राचार्य डॉ. एन. एस. झुल्पे, तज्ज्ञ संचालक एन. डी. जगताप, उपप्राचार्य डॉ. व्ही. व्ही. भोसले, उपप्राचार्य डॉ. डी. आर. सोमवंशी यांच्यासह विद्यार्थ्यांचे पालक उपस्थित होते.



## जुन्नर च्या प्राचीन नाणेघाट मार्ग व बौद्ध लेणीवर अभ्यास दौरा संपन्न :



जुन्नर / प्रतिनिधी :- रविवार दि:१४/०९/२०२५ रोजी एकजूट लेणी प्रचार प्रसार समूह व बुद्ध लेण्या मुक्ती आंदोलन समिती यांच्या वतीने आयोजित जुन्नर च्या प्राचीन नाणेघाट बौद्ध लेणीवर उपासकांच्या उपस्थितीत अभ्यास दौरा संपन्न झाला. नाणेघाट हा महाराष्ट्र राज्यातील एक प्राचीन व्यापारी घाट मार्ग असून हा मार्ग पूर्वीचे जीर्णनगर (जुन्नर) व कोकणातील भाग यांना जोडतो. हा घाटमार्ग सातवाहन-कालीन असून व्यापारासाठी सोयीचे व्हावे यासाठीच देश (सह्याद्रीच्या पूर्वेकडील महाराष्ट्र) व कोकणाला जोडत हा घाट इसवी सन पूर्व पहिल्या शतकात खोदण्यात आला होता . या मार्गाचे एक टोक वर जुन्नरच्या दिशेला, तर दुसरे खाली कोकणात मुरबाड तालुक्यात आहे. या अभ्यास दौऱ्याचे आयोजन एकजूट लेणी प्रचार प्रसार समूह चे प्रमुख आयु सारिश (दादूस ) डोळस व बुद्ध लेण्या मुक्ती आंदोलन समिती चे प्रमुख मनोज गजभार यांनी केले. मनोज गजभार यांनी कार्यक्रमाची प्रस्तावना व सूत्रसंचालन करून पालीभाषा व विविध लिप्यांच्या अभ्यासक आदरणीय सुजाता ताई नवघरे यांनी या ठिकाणी सतत का आलं पाहिजे ? आणि आपला प्राचीन भारताचा इतिहास का माहिती करून घेतला पाहिजे? याविषयी मार्गदर्शन केले. तसेच पुरातत्त्व विषयाचे व विविध लिप्यांचे अभ्यासक अशोक नगरे व बोधिसत्व चॅनल चे संचालक आयु सागर कांबळे यांनी प्राचीन नाणेघाट , सातवाहन राज घराणे, लेणीतील शिलालेख व महाराष्ट्रातील बुद्ध लेण्या विषयी सविस्तर माहिती उपस्थितांना दिली. एकजूटचे तसेच मैत्रेय बुद्ध विहार भांडुप येथील आयु. बबन ओव्हाळ यांच्या मार्गदर्शना खाली ध्यानसाधना देखील करण्यात आली व मोठ्या संख्येने उपासक उपस्थित राहून हा कार्यक्रम यशस्वी केल्याबद्दल त्यांनी सर्वांचे आभार मानले.

# लातूर जिल्हा रुग्णालयाचे भूमिपूजन होणार

## मंत्रालयीन पातळीवर प्रस्ताव अंतिम टप्प्यात- पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले

लातूर- प्रशासकीय स्तरावर होत असलेल्या हालचालींचा वेग पाहता लातूर जिल्हा रुग्णालयाचा प्रश्न अखेर मार्गी लागत असल्याचे चित्र दिसत आहे. अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या या प्रश्नासाठी 'माझं लातूर परिवार' सातत्याने पाठपुरावा करत आहे. या प्रश्नावर आता मंत्रालयीन स्तरावर हालचाली वेगाने सुरू झाल्या असून भूमिपूजन लवकरच होणार असल्याचे स्पष्ट संकेत पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी आज माझं लातूरच्या शिष्टमंडळास दिले. मराठवाडा मुक्तीसंग्राम दिनानिमित्त पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे यांच्या हस्ते मुख्य ध्वजारोहण झाले यानंतर शिष्टमंडळाशी संवाद साधताना त्यांनी हा शब्द दिला. जिल्ह्याचा पदभार स्वीकारल्यानंतर पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी रुग्णालयाच्या जागेचा व निधीचा प्रश्न मार्गी लावण्यासाठी विशेष प्रयत्न केले. त्यानंतर माझं लातूर परिवाराने जिल्हा प्रशासन, पालकमंत्री तसेच मुख्यमंत्री यांच्याकडे तातडीने भूमिपूजन करून कामाला सुरुवात करण्याची मागणी केली होती. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नुकत्याच झालेल्या लातूर दौऱ्यात या प्रश्नाचे निराकरण करण्याचे निर्देश दिले होते. तसेच १५ ऑगस्ट रोजी झालेल्या ध्वजारोहण सोहळ्यात पालकमंत्र्यांनी एका महिन्यात भूमिपूजन होईल असे जाहीर केले होते. मात्र आश्वासनाची पूर्तता न झाल्याने 'माझं लातूर परिवाराने आत्मक्लेश करण्याचा इशारा देत मुंडन आंदोलनाची घोषणा केली होती. दरम्यान, जिल्हा प्रशासनाने माझं लातूरशी संपर्क साधत शासकीय स्तरावर सुरु असलेल्या प्रक्रियेची माहिती देत हा प्रलंबित विषय अंतिम टप्प्यात असल्याचे निदर्शनास आणून दिले. त्यामुळे आत्मक्लेश आंदोलन स्थगित करण्याचा निर्णय परिवाराने घेतला. मराठवाडा मुक्ती संग्राम दिनानिमित्त हुतात्मा स्मारक येथे झालेल्या ध्वजारोहण कार्यक्रमानंतर माझं लातूर परिवाराच्या शिष्टमंडळाने पालकमंत्र्यांची भेट घेतली. या वेळी पालकमंत्री भोसले म्हणाले, ११ सप्टेंबर २०२५ रोजी मुख्यमंत्र्यांशी यासंदर्भात पत्रव्यवहार केला आहे. प्रस्ताव सध्या आरोग्य विभागाच्या मुख्य सचिवांकडे असून, मुख्यमंत्री यांच्या शिफारशीने तो आठ दिवसांत मंजूर होईल. त्यानंतर तात्काळ भूमिपूजनाचा मार्ग मोकळा होईल. जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे आणि जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. प्रदिप ढेले यांच्या उपस्थितीत झालेल्या या भेटीत पालकमंत्र्यांनी रुग्णालयाचे भूमिपूजन लवकरात लवकर होईल असा विश्वास दिला. आरोग्य विभागाने याबाबत जलद कार्यवाही करून रुग्णालयाचे काम प्रत्यक्ष सुरू व्हावे यासाठीचे प्रयत्न करावेत अशी मागणी शिष्टमंडळाने पालकमंत्र्यांकडे केली. तुम्ही निश्चित रहा लातूरकरांवरती मुंडन करण्याची वेळ मी येऊ देणार नाही असे मिश्किलपणे पालकमंत्री यावेळी म्हणाले. शिष्टमंडळात दिपरत्न निलंगेकर, अभय मिरजकर, डॉ सितम सोनवणे, शिरीषकुमार शेरखाने, उमेश कांबळे, डॉ जुगलकिशोर तोष्णीवाल, अरविंद रेड्डी यांचा समावेश होता. एकूणच प्रशासकीय हालचाली आणि पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी दाखवलेला विश्वास पाहता लातूरकरांच्या दीर्घकाळच्या प्रतीक्षेला आता लवकरच पूर्णविराम मिळण्याची आशा व्यक्त केली जात आहे.



# इंदिरा नगरच्या महाबोधी बुद्ध विहारास तीर्थक्षेत्राचा दर्जा द्यावा राष्ट्रवादी किसान सभेची मागणी.

## माजी मंत्री आ.संजय बनसोडे यांनी पालकमंत्री शिवेंद्र सिंह भोसले यांना राष्ट्रवादी किसान सभेच्या हस्ते दिले पत्र.

लातूर / प्रतिनिधी :- लातूर शहर प्रभाग क्रमांक ३ मधील इंदिरानगर येथील महाबोधी बुद्ध विहारास तीर्थ क्षेत्राचा दर्जा देण्यात यावा या मागणीसाठी राष्ट्रवादी किसान सभा यांनी मंगळवार दिनांक १६ सप्टेंबर २०२५ रोजी माजी मंत्री विधानसभा सदस्य संजय बनसोडे यांना निवेदन देण्यात आल्याने या निवेदनावरून संजय बनसोडे यांनी पालकमंत्र्यांचे नावे पत्र देण्यात आले. लातूर शहरातील पूर्व भागात प्रभाग क्रमांक ३ मधील इंदिरानगर येथील महाबोधी बुध्द विहार हे अतिशय विशाल व भव्य आहे. या महाबोधी बुध्द विहारातील बुद्ध मूर्ती ही अतिशय सुंदर असून नागपूर येथील दिक्षाभूमीची प्रतिकृती असल्याची लातूर जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात चर्चा होताना पाहायला दिसत असून या महाबोधी बुद्ध विहारला महाराष्ट्रातून नागरिक भेटी देत आहेत. महाबोधी बुद्ध विहारात श्रामणेर शिबीर, उपासक उपासिका संस्कार शिबीर, विपश्याना शिबीर असे अनेक विविध कार्यक्रम येथे सातत्याने होत असूनही अद्यापपर्यंत सदरच्या बुध्द विहारास तीर्थ क्षेत्राचा दर्जा मिळालेला नाही. येथे होत असलेल्या विविध शिबिरांना महाराष्ट्र राज्यातून, पर राज्यातून नागरिक येथे येत असतात यामुळे प्रभाग क्रमांक ३ इंदिरानगर भागातील राष्ट्रवादी किसान सभेचे राहुल बनसोडे यांच्या नेतृत्वात येतील नागरिकांनी संजय बनसोडे यांची भेट घेऊन महाबोधी बुद्ध विहारास तीर्थक्षेत्राचा दर्जा देण्यात यावा म्हणून निवेदन देण्यात आले. या निवेदनाची तात्काळ दखल घेत माजी मंत्री विधानसभा सदस्य माननीय आमदार संजय बनसोडे यांनी लातूर जिल्ह्याचे पालकमंत्री शिवेंद्रसिंह राजे भोसले यांच्या नावे राष्ट्रवादी किसान सभेचे राहुल बनसोडे यांच्याकडे पत्र दिले व तात्काळ पालकमंत्र्यांची भेट घेऊन त्यांना पत्र द्यावे असे सुचित केल्याने आज बुधवार दिनांक १७ सप्टेंबर २०२५ मराठवाडा मुक्ती संग्राम दिन असल्याने राष्ट्रवादी किसान सभेच्या नागरिकांनी लातूर जिल्ह्याचे पालकमंत्री शिवेंद्रसिंह राजे भोसले यांची मराठवाडा मुक्ती संग्राम स्थळी भेट घेत माजी मंत्री तथा विधानसभा सदस्य संजय बनसोडे यांचे पत्र देत प्रभाग क्रमांक ३ मधील महाबोधी बुद्ध विहारास तीर्थक्षेत्राचा दर्जा देण्यात यावा व संबंधितास उचित निर्देश देण्यात यावेत अशी मागणी करण्यात आली. लातूर जिल्ह्याचे पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांना पत्र देताना प्रशांत पाटील, राहुल बनसोडे, संतोष उपाडे, नवनाथ आल्टे, प्रणिती सूर्यवंशी, ड. प्रदीप गंगणे, प्रवीणसिंह थोरात, ड. राजकिरण सूर्यवंशी, मयूर जाधव, अडवोकेट राजेश खटके, जहांगीर शेख, खमर काझी, सोहम गायकवाड, दीपक समुखराव आदींसह प्रभाग ३ मधील इतर नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.




दैनिक महावृत्त पहा ऑनलाईन कोठेही mhavratt.com या वेबसाईटवर पाहता येणार

# संपादकीय

## स्वामी विवेकानंदांचे भाकीत मोदींनी आणले सत्यात

पौर्वात्य भारतीय ज्ञान परंपरा आणि पाश्चिमात्य शास्त्रीय ज्ञान यांचे सिम्बायोसिस म्हणजेच सहजीवन होईल, हे त्यांचे भाकीत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आज सत्यात आणले आहे. विवेकानंद म्हणाले होते की, विसावे शतक हे पाश्चिमात्यांचे असेल; परंतु एकविसावे शतक हे भारताचे राहणार आहे. कारण, एकविसाव्या शतकात भारत हा विश्वगुरू होणार आहे. त्यांची ही भविष्यवाणी नरेंद्र मोदी यांच्या भगीरथ प्रयत्नामुळे साध्य होताना दिसते आहे. डॉ. शां. ब. मुजुमदार संस्थापक आणि अध्यक्ष, सिम्बायोसिस मोदी हा धाडसी माणूस आहे. 'धिटाई खाई मिठाई' या उक्तीप्रमाणे ते निर्णय घेत असतात. कोणताही निर्णय ते बेधडकपणे घेत असतात. 'मन की बात' हा त्यांचा उपक्रम खूपच चांगला आहे. देशाचा एक पंतप्रधान भारतीय संस्कृती, शिक्षणावर बोलतो, देशातील खेड्यापाड्यात कोणकोणते चांगले प्रयोग झाले, याबद्दल बोलतो. त्यासाठी रेडिओचे माध्यम स्वीकारले, त्याला एक निराळा अर्थ आहे. मोदी एक पहिली व्यक्ती आहे की, ज्यांनी 'मी भारतीय आहे, मी हिंदू आहे' याचा अभिमान लोकांमध्ये जागृत केला. परदेशात त्यांनी भारताचा नावलौकिक वाढवला. त्याचे कारण म्हणजे वक्तृत्व. स्वामी विवेकानंद यांच्या नंतरचा उत्तम वक्ता मोदीच आहेत. भारताबद्दलचे अनेक गैरसमज त्यांनी नाहीसे केले. जगात कुठेही गेले, तरी भारतीयांना सन्मान दिला जातो. भारतामध्ये भारतीयत्वाला पुनर्जीवित करणे आणि परदेशात भारतीयांबद्दल एक वेगळे स्थान निर्माण करणे असे दुहेरी प्रयोग त्यांनी केले. म्हणून मला असे वाटते, पौर्वात्यांचे शहाणपण आणि पाश्चिमात्यांची गतिशीलता यांचा आंतर्भाव अभ्यासक्रमात झाला, तर स्वामी विवेकानंदांचे विश्वगुरू होण्याचे स्वप्न साकार होणार आहे. शिक्षण आणि संस्कृती ही एकत्र गेली पाहिजे. स्वामी विवेकानंदाचे स्वप्न साकारणारे मोदी आहेत. मन की बात, योगा, भारतीयांना सन्मान या उपक्रमांनंतर राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची निर्मिती, राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात पूर्व प्राथमिक शिक्षणावर भर देण्यात आला आहे. लहान वयातच मुलांच्या मेंदूचा विकास होतो आणि नंतर तो थांबतो त्यामुळे त्यांच्यावर संस्कार करण्याचा काळ हा बालपणच आहे. त्यामुळे संबंधित राष्ट्रीय शिक्षण धोरणाचा आत्मा काय असावा, हे मोदी यांनीच सांगितले. यासाठी अमेरिका आणि भारतातील मानसशास्त्रज्ञांची एक समिती तयार करून पूर्व प्राथमिक शिक्षणावर भर देण्याचा निर्णय घेतला. त्यासाठी पाच वर्षांचा कालावधी दिला. मी गेल्या साठ ते सत्तर वर्षांपासून शिक्षण क्षेत्रात काम करतो आहे; पण मला त्यातला शिक्षणाविषयीचा भावलेला हा सर्वात मोठा निर्णय आहे. मोदींची दूरदृष्टी ही त्यांची आंतर्दृष्टी आहे. त्यांच्या आंतप्रेरणेतूनच ते विविध कार्य करत आहेत. शैक्षणिक संस्थांमध्ये केवळ संख्यात्मक वाढ करण्यापेक्षा आहे त्या संस्थांमध्ये प्राध्यापक पदे रिक्त आहेत, ती भरणे गरजेचे आहे. त्याशिवाय संबंधित संस्थांमध्ये पायाभूत सुविधा वाढवणे गरजेचे आहे. संशोधनावर भर देत असताना शास्त्रज्ञांना प्रोत्साहन देण्याबरोबरच विज्ञान शाखेत अमूलाग्र बदलांची गरज आहे. या सर्वांचा विचार त्यांच्याकडून सुरू आहे. सिम्बायोसिसची स्थापना झाली दि. २६ जानेवारी १९७१ रोजी. सुरुवातीच्या काळात सिम्बायोसिस आंतरराष्ट्रीय सांस्कृतिक केंद्र सुरू करण्यात आले. पुण्यातील परदेशी विद्यार्थ्यांना स्वतःचे घर मिळाले.

त्यावेळेस आम्ही अनेक सांस्कृतिक कार्यक्रम करायचो, ज्यामध्ये परदेशी आणि भारतीय विद्यार्थी–विद्यार्थिनी एकत्र येऊन अनेक कार्यक्रम सादर करत असत. कालांतराने फक्त सांस्कृतिक केंद्र ही संकल्पना मला फार संकुचित वाटू लागली. म्हणूनच सांस्कृतिक केंद्रासोबत शैक्षणिक संस्थेचासुद्धा विचार सुरू झाला. अभिमत विद्यापीठाचा दर्जा मिळाल्यामुळे बंगलोर, नाशिक, नोएडा, हैदराबाद, नागपूर या ठिकाणी आम्ही केंद्रे स्थापन केली. १९७६ ते २०२१ दरम्यान संस्थेचे चांगल्या अर्थाने ब्रँडिंग झाले. संस्कृती आणि शिक्षण या दोन गोष्टींनी एकत्र वाटचाल करणे गरजेचे आहे. शिक्षणाविना संस्कृती आणि संस्कृतीविना शिक्षण यांना काहीच अर्थ नाही. म्हणूनच आम्ही हळूहळू लॉ कॉलेज, मॅनेजमेंट इन्स्टिट्यूट अशा एकेक संस्था नव्याने सुरू करत राहिलो. आता सिम्बायोसिसच्या जवळजवळ ३० ते ४० संस्था सुरू झालेल्या आहेत. बघताबघता ही दमदार वाटचाल २०२१ मध्ये संस्थेच्या पन्नासाव्या वर्षात येऊन ठेपली. २०२० मध्येच विद्यापीठाचा सुवर्णमहोत्सव साजरा होणं अपेक्षित होतं; परंतु कोरोनाचं संकट आलं आणि सगळंच ठप्प झालं. २०२१ मध्ये कोरोनाचं संकट दूर झालं आणि २०२२ मध्ये सुवर्णमहोत्सव करण्याचं आम्ही निश्चित केले. प्रमुख पाहुणे म्हणून कोण असावे, यावर सविस्तर चर्चा झाली आणि अर्थातच नरेंद्र मोदी यांचे नाव आघाडीवर होते. २०१४ मध्ये त्यांनी पंतप्रधानपद स्वीकारले आणि त्यानंतर त्यांना अफाट लोकप्रियता मिळाली. भारतासह जगात त्यांचा एक दबदबा निर्माण झाला होता. देशाला नवीन दृष्टी देण्याची त्यांची एक वेगळी पद्धत आहे. ते पंतप्रधान झाल्यानंतर भारताची प्रतिमा जगात उंचावली. आता एखादा भारतीय परदेशात गेला की, त्यालाही तिथे एक प्रकारचा आदर मिळतोच. त्यांनी भारताला आणि भारतीयांना एक वेगळी उंची मिळवून दिली. त्यामुळे त्यांना सिम्बायोसिसमध्ये सन्मानाने निमंत्रित करणं हे माझं स्वप्न होतं; परंतु राष्ट्राध्यक्ष आणि पंतप्रधान हे खासगी विद्यापीठांना सहसा भेट देत नाहीत; पण आपण निमंत्रण दिल्यानंतर ते येऊ शकतील, असा एक आशेचा किरण माझ्याकडे होता. नरेंद मोदी हे स्वतः सिम्बायोसिसविषयी जाणून होते. २००९ मध्ये गुजरातमध्येसुद्धा सिम्बायोसिस विद्यापीठाची शाखा असावी असा त्यांचा मानस होता. म्हणून ते स्वतः भेट द्यायला आले होते. त्यामुळे सिम्बायोसिसबद्दल त्यांना तशी कल्पना होतीच. सिम्बायोसिस हे खासगी असले, तरीही त्या विद्यापीठास एक प्रतिष्ठा आणि नैतिकता आहे, याची त्यांना खात्री होती. उगाच पैसे देऊन प्रवेश दिला जाणे या गोष्टी इथे होत नसून इथून बाहेर पडणार्या विद्यार्थ्याला नोकरी मिळणारच, हेदेखील ठाऊक होते. अर्थात, हे सगळे असले, तरी ते येतील का, याबाबत मला शंकाच वाटत होती. आम्ही त्यांना पत्र पाठवलं आणि मग आम्हाला एक आश्चर्याचा आणि आनंदाचा सुखद धक्का बसला. पुण्यातील मेट्रोच्या उद्घाटनप्रसंगी नरेंद्र मोदी येणार होते. मेट्रो उद्घाटनाची तारीख ६ मार्च २०२२ अशी ठरलेली होती. त्याच दिवशी त्यांनी दुसरा कार्यक्रम सिम्बायोसिसचा स्वीकारला होता. या गोष्टीचा मला अत्यंतिक आनंद झाला.

# आठवणीतील माय!

गोष्ट आहे चार ते पाच दशकांपूर्वीची! कधीही घर आणि माय यापासून पारखां न झालेल्या मुलाने दूरवरच्या एका शाळेत प्रवेश घेतला. त्या गावाचं अंतर पंधरा–वीस मैलांपेक्षा फार नसलं तरी त्याकाळी त्याच्या साठी ते जमीन आस्मानाच्या पलीकडील होतं. त्यामध्ये दोन मैलांचं अंतर पायी चालून दोन वेळा बसगाड्या बदलाव्या लागत होत्या. (आजही फारशी काही परिस्थिती बदलली असं काही नाही) गावामध्ये घडलेल्या काही राजकीय आणि सामाजिक घडामोडींचा परिणाम म्हणून तिथे बाप आणि भाऊ एका वर्षाआधीच पोटापाण्याचा प्रश्न सोडवण्यासाठी मोलमजुरीच्या उद्देशाने पोहोचलेले होते. भाऊ म्हणजे फारसा मोठा नव्हता, तर तो दोन इयत्तानीच पुढे होता. उन्हाळ्यात नाव दाखल करण्याविषयी घरामध्ये चर्चा झाल्यामुळे सुरुवातीला लेकराच्या चेहऱ्यावरील आनंद ओसंडून वाहत होता, त्यामुळे तो आपला प्रवेश कुठे आणि कसा झाला? आपण केव्हा जाणार? ते गाव खूप मोठे असून तेथे दहावीपर्यंत शाळा आहे अशा प्रकारची शेखी तो मित्रांमध्ये मिरवत होता. कारण तोपर्यंत त्यानं घर सोडून दार सुद्धा पाहिलेलं नव्हतं.

त्याला परगावी शिकायला जाण्याचं गांभीर्य कळत नव्हतं. त्याची माय म्हणजे त्याचा श्वास, त्याचं सर्वस्व, त्याचं जग होतं. आई शिवाय त्याचं पानही हलत नव्हतं, तरीही त्या अबोध, निरागस, निर्मळ मनाच्या निष्पाप पोराला जाण होत नव्हती की, आपण लवकरच माय पासून दूर जाणार आहोत.

आपलं लेकरू जरी आनंदात असलं तरी मायची काळजी मात्र वाढत होती. माय–माय करून हरघडी पायाशी घुटमळणारं आणि रात्र झाली की, कुशीत झोपून प्रत्येक गोष्टीला मायला आवाज देणारं माझं लेकरू, व्यवस्थित राहील की नाही? त्याचं माझ्याशिवाय कसं भागणार? मायची ममता त्याला कोण देणार? यासारख्या अनेक प्रश्नांनी तीचं मन गोंधळून गेल्यामुळे तिच्या डोळ्यात गंगा–जमुना उभ्या राहत होत्या. मग हळूच ती आवंढा गिळत खेळणाऱ्या लेकराकडे पाहत राही.

संध्याकाळी ती चुलीजवळ स्वयंपाक करायला बसली, की तीनही लेकर तिच्या आजूबाजूला बसून तिच्याशी हितगुज करताना त्यांच्या सामान्य ज्ञानात भर पडत असे. चुलीजवळ पेटत्या काड्यांचा थोडासा प्रकाश आणि मातीच्या तेलाचा दिवा एवढ्या प्रकाशात एकमेकांचा चेहराही स्पष्ट न दिसता गप्पांना मात्र रंगत यायची. उजेड कमी असला तरी डोक्यात उजेड पडेल इतपत ज्ञानरूपी प्रकाश त्यांना मायकडून मिळत असे. गप्पा रंगात आल्यावर माय हळूच शिक्षणाचा विषय घ्यायची. ती पूर्णपणे निरक्षर असली तरी तिची शिक्षणावर पूर्ण आस्था आणि भिस्त होती. कारण शिक्षणामुळे अनेकांचं आयुष्य आर–पार बदलून जाताना तिने उघड्या डोळ्यांनी पाहिलं होतं. म्हणून ती समाजात सुद्धा सांगायची की, 'माणसाचं पोरानं भलं, की ढोरानं भलं'! म्हणून ती दोघांनाही प्रेमाने वाढवत होती.

याबद्दल लेकरांना जेव्हा ती ज्ञानाच्या गोष्टी सांगायची तेव्हा ती एखाद्या विद्यापीठाप्रमाणे भासत होती. ती त्यांना डॉ. बाबासाहेब आंबेडकरांबद्दल सांगताना म्हणायची की, 'त्यांनी शिक्षणासाठी खूप कष्ट घेतले. शाळेत त्यांना प्यायला पाणी मिळत नव्हतं. वर्गाबाहेर बसून त्यांनी शिक्षण पूर्ण केलं. शिक्षणामुळे संपूर्ण जगात त्यांचं नाव झालं,. त्यासोबतच ती नोकरीवाल्या साहेबांच जीवन कसं असते त्यांना बसायला गाडी, राहायला बंगला, महागडे कपडे याबद्दल ती कुतुहलाने सांगायची. लेकरं मंत्रमुग्ध होऊन ऐकायचे. नंतर परगावी शिक्षणाला जाण्याचा विषय निघायचा तेव्हा मात्र ती भावनिक होऊन बोलायची. तिच्या भावनांवर तिचा ताबा राहत नव्हता. अगदी एखाद्या शिक्षकांसारखी सूचना देता देता कधी तिच्या डोळ्यात अश्रूंचा महापूर थाटायचा हे लक्षात येत नव्हतं. मोठ्या लेकराला ती कळवळल्या मनाने सांगायची की, 'तो लहान आहे. बाप कामाला जाईल, त्यांचं लक्ष देणं होणार नाही, म्हणून तू त्याच्याकडे लक्ष देवून त्याची काळजी घेतली पाहिजे. दोघं आपसात भांडू नका. अगदी बंधूभावाने राहा'. अशा अनेक सूचना देताना ती हतबल झाल्यासारखी दिसायची. तेव्हा मात्र चुलीजवळ भयान शांतता पसरात होती.

शेवटी परगावी जाण्याचा दिवस उजाडला. त्या दिवशी माय सकाळी लवकर उठून तिने ज्वारीच्या भाकऱ्या व उपलब्ध असेल ती दाळभाजी केली. दोन्ही लेकरांची आपल्या हाताने (साबणाच्या अभावामुळे) कवेलूच्या तुकड्याने अंग घासून–घासून आंघोळ घालून दिली. आंघोळ घालतानाही तिची सूचनांची सरबत्ती काही थांबत नव्हती. परंतु त्या नऊ वर्षांच्या अल्लड लेकराला त्याचं गांभीर्य अजूनही कळत नव्हतं. तो मात्र वेगळ्याच जगात वावरत होता.

बघता बघता निघण्याचीही वेळ झाली. दोन्ही लेकरांना वाटी लावण्यासाठी माय थोड्या अंतरासाठी सोबत निघाली. सरळ जाणारी पाऊलवाट, त्यात दिवस उन्हाळ्याचे त्यामुळे जंगल एकदम निर्मनुष्य होतं. दूरपर्यंत कोणाचा थांगपत्ता नाही. सोबत चालताना मायनं बरच अंतर कापलं. तिची माया तिला थांबू देत नव्हती. आपली पिल्लं आपल्यापासून दूर जाताना तिच्या मनाची कालवा–कालव होत होती. ती एखाद्या घायाळ हत्तीनीप्रमाणे भासत होती. तिचे पाय थांबायचं नाव घेत नव्हते. शेवटी तिला थांबावं लागलं. तेव्हा तिच्या हृदयाचा बांध एकदम फुटला आणि एक–एका डोळ्याला दोनदोन धारा लागल्या. ती पटापट लेकरांचे मुके घेऊ लागली. मायला रडताना पाहून लेकरांना प्रसंगाचं गांभीर्य कळायला लागलं. त्याच्या लक्षात आलं, की हा निर्णय सोपा नाही. त्याचेही डोळे पानावले. ते पाहून मायचा हुंदका आणखीच दाटून आला. परंतु स्वतःला सावरत तीनं, 'जा आता बरोबर' एवढं म्हणून मोठ्या लेकराला सूचना केली की, 'गर्दीत त्याचा हात सोडू नको'. लेकरं डबडबल्या डोळ्यांनी पुढे चालू लागली. माय त्यांच्याकडे एकटक पाहत जाग्यावरच उभी होती. लेकरं पावला–पावलांवर मायकडे मागे उलटून पाहत होते. माय फक्त हात हलवून जाण्याचा संकेत करत होती. नजर पुरेल तिथपर्यंत माय जागेवरच उभी होती. अंतर वाढत होतं. माय दिसेनाशी होत होती. त्यामुळे लेकर जाग्यावरून उंच टाचा करून मायला शोधण्याचा प्रयत्न करत होते. त्यात लहान लेकराला एक युक्ती सुचली तो एका उंच टेकडावर जाऊन पाहू लागला, परंतु सर्व निरर्थक. माय दिसेनाशी झाली होती. गाईपासून ताटातूट झाल्यामुळे सैरावैरा धावणाऱ्या वासराप्रमाणे त्यांच्या मनाची घालमेल सुरू झाली.

जवळच दोन मैल अंतरावर पुढील शिक्षणाची व्यवस्था असतानाही या लेकरांची मायपासून ताटातून का झाली? त्या कुटुंबावर गाव सोडण्याची पाळी का आली? याची कारणमिमांसा केल्यानंतर लक्षात येते की, त्याची अनेक कारणं होती. त्यापैकी सर्वात मोठं कारण म्हणजे त्या गांवखेड्यातील बिघडलेली सामाजिक परिस्थिती! एकेकाळी गुण्यागोविंदाने नांदणारा स्वयंपूर्ण गाव; एका जातीयवादी पक्ष संघटनेच्या आहारी गेल्यामुळे एकमेकांना पाण्यात पाहू लागला. त्याचे परिणाम वाढत जाऊन एक दिवस दोन गट एकमेकांच्या अमोरासमोर शस्त्रानिशी उभे ठाकले. हाणामारी, डोकेफोडी होऊन अनेक जण जखमी झाले. वेळीच पोलिसांनी हस्तक्षेप केल्यामुळे जीवितहानी टळली. परिणामी गावात पोटापाण्याचा प्रश्न निर्माण झाला. कोणी कोणाला मजुरीला सांगत नव्हतं. अल्पसंख्याक गटावर उपासमारीची पाळी आली. म्हणून अनेकांनी गाव सोडणे पसंत केलं. त्यामुळे कित्येक कुटुंब परागंधा झाली. परंतु लेकराच्या कुटुंबाने मात्र वेगळाच निर्णय घेत, मायनं सर्वात लहान मुलीसह गावी राहून जमिनीचा तुकडा सांभाळावा, तर बापानं बाहेरगावी मोल–मजुरी करून घर चालवावं. त्यात बापानं आणखी एक धाडस केलं, ती म्हणजे लेकरांच्या शिक्षणाची जबाबदारी स्वीकारली. कारण गावात तिसरीपेक्षा जास्त शिक्षणाची व्यवस्था नव्हती.

माय खूप कणखर बाण्याची होती गावातील सामाजिक सलोखा पूर्णपणे बिघडलेला असतानाही ती मोठ्या धैर्याने गावात राहत होती. तिच्या निडरपणाची अनेक जण दाद देत होते. तिच्याकडे वाकड्या नजरेने पाहण्याची कुणाची हिम्मत होत नव्हती. एकदा बापाला काही लोकांनी जातीय भावनेने घेरलं, तेव्हा ती हातात विळा घेऊन माणसांच्या गराड्यात बापाच्या पुढे एकदम ढालीसारखी उभी होती. पर्यायाने हल्ला करण्याची कुणाचीही छाती झाली नाही. गावात जातीय दंगल झाली तेव्हाही ती हातात मिरची पूड आणि तिखट पाणी घेऊन विरोधकांना नामोहरम करण्यासाठी माणसांच्या खांद्याला खांदा लावून लढत होती. 'निर्भय व्हा आणि जगाचं राज्य मिळवा' हा डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा संदेश बहुतेक तिनं ऐकला असावा, म्हणून ती मरणालाही घाबरत नसावी.

कुटुंबावर कितीही मोठं संकट आलं तरी ती सर्वांना धीर धीर देत होती. संकटावर मात कशी करावी, त्यातून मार्ग कसा काढावा, यामध्ये तिचा हातखंडा होता. अनेक जण तिचा सल्ला सुद्धा घेत होते.

लेकरं मोठे होऊन संसारिक झाल्यावरही कुटुंबात तिची टेक कायम होती. जशी ती कणखर होती, तशीच ती कष्टाळू आणि कणवाळू सुद्धा होती. तिच्या हयातीत कुटुंबकलह कधीच कुणाच्या नजरेस पडला नाही. शेवटच्या काळात शिक्षणामुळे थोडी बहुत परिस्थिती बदलली. परंतु तिचा अहं मात्र कधीच बदलला नाही. त्यामुळे आजही तिचे लेकरं तिच्या पाऊलखुणा शोधतात आणि त्यावरच मार्गक्रमण करण्याचा प्रयत्न करतात. लेकरांकडे मायबापाचा विषय निघाला की, त्यांच्या आठवणीने त्यांचा जीव कासावीस होऊन मेटाकुटीला येतो आणि त्यांना जाणीव होते की, जगात सर्व काही मिळतं परंतु मायबाप नाही!

**********

भिमराव परघरमोल
लेखक, व्याख्याता तथा अभ्यासक
फुले, शाहू, आंबेडकरी
विचारधारा
तेल्हारा जि. अकोला
मो.९६०५६१०४

# थँक्स न्ड थँक यू इज नॉट सेड टू बी सेम शॉर्टकटचा नाद अन् संदर्भाचा वाद

सर्व प्राणीमात्रातील प्राण्यांपैकी सर्वात बुद्धिमान प्राणी म्हणजे माणूस. पण याच बुद्धिमान प्राण्याला ओळखणं म्हणजे समुद्राचा तळ गाठण्यासारखं आहे. माणसं ओळखण्याचे अनेक पैलू आहेत. त्यातीलच एक पैलू म्हणजे भाषा. याच भाषेवरून त्याच्या स्वभावाचा एक कयास बांधला जातो. पण हा कयास खराच ठरेल असंही नाही. कारण खायचे दात वेगळे आणि दाखवायचे वेगळेच असते. कधी कधी तुम्ही जोश (पॅशन) मध्ये होश (एन्थुसिझम) गमावून एखाद्याला अबे, पागल... माझा दिमाग खराब करू नको? असलं काही बोलून मोकळे होता. पण पागल ते आहे की तुम्ही? दिमाग त्याला आहे की तुम्हाला? हे तुमच्या संवादातून स्पष्ट होते. तुम्ही वापरत असलेले शब्द तुमचं व्यक्तिमत्व आणि इतरांना देत असलेला आदर व्यक्त करतात. शिवाय कधी तरी तुम्ही एखाद्याला जबाबदार नागरिकत्वाची जाणिव करून देत असता. याउलट सतराशे साठ लफडी करून तुम्ही किती जबाबदार नागरिकाची भूमिका पार पाडता? हे तपासणे गरजेचं आहे. सांगायचं तात्पर्य म्हणजे एखाद्याशी संवाद साधण्यासाठी शेवटी भाषा महत्त्वाची असते.

अगदी त्याचप्रमाणे माणूस आणि प्राण्यांमधील सर्वात मोठा फरक म्हणजे भाषा! मानवाला एकमेकांशी संवाद साधण्याची कला अवगत असून त्याच्या जोरावरच समाजिक रचना आणि इतर अनेक गोष्टी त्याला मिळवता आल्या. जगात हजारो भाषा आहेत. त्यापैकी सर्वाधिक वापरल्या जाणा–या आणि जागतिक भाषा म्हणून ओळख असलेली भाषा म्हणजे इंग्रजी! डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी ज्या भाषेला 'वाघिणीचं दूध' म्हटलं अशी भाषा आजही अनेकांना अवघड वाटते आणि ते वाटणारच... वाघिणीचं दूध काढणं एवढं सोपं असतं का? आजपर्यंत कुणी काढलं आहे का? त्यामुळे तसा प्रयत्न केला की गफलत तर होणारच. मात्र, टेक्नॉलॉजीच्या या युगात इंग्रजी पूर्वीपेक्षा फारच फ्रेंडली भाषा झाली आहे. पण आजही इंग्रजीमधील काही शब्द वापरताना आपण गलती करतो. अनेक इंग्रजी शब्द तर आपल्या दैनंदिन आयुष्याचा भाग झाले आहेत. पण ते सुद्धा आपण चुकीच्या संदर्भातून वापरतो असं तुम्हाला सांगितल्यास आश्चर्य वाटेल. पण हे खरं..!

आपण दैनंदिन वापरामध्ये अनेक शब्द एकमेकांना पर्यायी आणि पुरक शब्द म्हणून वापरतो. तसेच प्रत्येक भाषेतील काही शब्दांची काही ना काही गंमत असते. त्यापैकीच इंग्रजीतील थँक्स आणि थँक यू या दोन शब्दांची देखील एक गोष्ट आहे. आपल्यातले जवळपास सर्वचजण थँक्स हा थँक यू चा शॉर्टकट असल्याचं समजतात. अख्खा थँक यू शब्द बोलण्याऐवजी थँक्स बोलून अनेकजण मोकळे होतात. मात्र, हे दोन शब्द उच्चारायला सारखेच असले तरी त्यांचा अर्थ वेगवेगळा असून तो संदर्भाप्रमाणे बदलतो. अर्थात भाषेतील हे बारकावे आपण दैनंदिन वापरात फारसे मनावर घेत नाही. मात्र, त्यांचा मूळ अर्थ समजून घेणं गरजेचं आहे. तुम्ही सुद्धा थँक्स आणि थँक यू हे दोन शब्द यापूर्वी अनेकदा वापरले असतील. मात्र, हे दोन्ही शब्द सारख्याच अर्थाचे नाही असं सांगितल्यास तुम्हाला नक्कीच आश्चर्य वाटेल, पण हे खरं आहे.

थँक्सचा वापर कुठे केला जातो? अगदी सोप्या शब्दात सांगायचं झालं तर आपल्या अत्यंत जवळच्या व्यक्तींबरोबर बोलताना हा शब्द वापरला जातो. मित्र, ऑफिसमधले सहकारी, कुटुंबातील सदस्यांशी बोलताना थँक्स शब्दाचा वापर केला जातो. आपण दिवसभरात अनेक छोट्या–मोठ्या कामांसाठी एकमेकांना थँक्स बोलतो. अनेकदा हे आपल्या लक्षातही येत नाही इतकी ही सामान्य आणि नैसर्गिक गोष्ट आहे. मात्र, ज्या ठिकाणी औपचारिक (फॉर्मल) संवाद साधला जातो तिथे थँक्स हा शब्द वापरू नये असं म्हटल्या जातं.

तर थँक यू कधी वापरतात? आता, ज्याप्रमाणे थँक्स हा जवळच्या लोकांसाठी वापरतात त्याचप्रमाणे थँक यू हा शब्द क्वचित भेटणा–या, वयाने मोठ्या, औपचारिक संवाददरम्यान वापरला जातो. म्हणजेच अधिकारी, शिक्षक, अनोळखी व्यक्ती, वयस्कर माणसं, प्रवासात भेटणारे लोकं यांच्याशी बोलताना थँक यू वापरणं योग्य ठरतं. औपचारिक संवाददरम्यान आभार व्यक्त करण्यासाठी थँक यू शब्द वापरतात. अनोळखी व्यक्तीचे आभार मानताना थँक यू वापरल्यास समोरच्या व्यक्तीला त्याने केलेल्या कामासाठी आपण त्याचे आभार असल्याचा संदेश पोहचतो. हा शब्द सामान्यपणे जवळीक दर्शवण्याऐवजी आदर, नम्रपणा दर्शवतो.

मात्र, हे दोन शब्द एकमेकांना पुरक वापरले तरी हरकत नाही. कारण थँक यू म्हणून जसा आदर व्यक्त होतो तसाच थँक्स मधूनही होतो फक्त तो अनौपचारिक (इनफॉर्मल) शब्द आहे. दोन्ही शब्द हे आदरार्थीच आहेत. फक्त ते कुठे आणि कसे वापरावेत हे आपण कोणाशी बोलतो यावर अवलंबून असतं. थँक्स आणि थँक यू या शब्दांचा अर्थ एकच आहे का? असा प्रश्न जर पुढे येत असतील तर त्याचे उत्तर निश्चितच नाही. थँक्स आणि थँक यू यांचा अर्थ समान असला तरी त्यांचा वापर संदर्भानुसार बदलतो. ब–याच इंग्रजी भाषिकांनाही थँक्स आणि थँक यू मधील फरकाबद्दल गोंधळ झाला आहे. सोप्या इंग्रजीत दोन्ही शब्दांच्या अर्थामध्ये थँक्स हे अनौपचारिक आहे, तर थँक यू हे अधिक औपचारिक आणि आदर दर्शवणारा शब्द आहे. हे अधिक सभ्य मानले जाते.

हे दोन्ही शब्द कोणत्या परिस्थितीत वापरल्या जाते? थँक्स हा शब्द जवळच्या व्यक्तींसोबत, जसे की मित्र, सहकारी, कुटुंबातील सदस्य यांच्याशी अनौपचारिक संवादात वापरला जातो. दैनंदिन छोट्या–मोठ्या कामांसाठी आभार व्यक्त करताना हा शब्द वापरला जातो. तर थँक यू हा शब्द औपचारिक संवादात, वयाने मोठ्या व्यक्ती, अनोळखी लोकं, अधिकारी, शिक्षक किंवा प्रवासात भेटणा–या व्यक्तींशी बोलताना वापरला जातो. हा शब्द आदर आणि नम्रपणा दर्शवतो. थँक्स हा थँक यू चा शॉर्टकट आहे का? ब–याच जणांना थँक्स हा थँक यू चा शॉर्टकट वाटतो, पण तसे नाही. दोन्ही शब्दांचा वापर संदर्भानुसार वेगळा आहे.

थँक्स अनौपचारिक आहे. अनौपचारिक म्हणजे औपचारिकता, नियम किंवा परंपरा नसलेली, मोकळी आणि सहज अशी स्थिती. उदा. मित्र आणि कुटुंबीयांशी बोलताना वापरली जाणारी भाषा अनौपचारिक असते. हे शब्द, लेखनशैली, कपडे किंवा अगदी संस्थांच्या संदर्भातही वापरले जाते, जिथे अनौपचारिक संस्था म्हणजे कर्मचा–यांमध्ये आपोआप तयार होणारे नातेसंबंध.

तर थँक यू औपचारिक संवादासाठी योग्य आहे. औपचारिक म्हणजे सामाजिक नियम, शिष्टाचार आणि परंपरांचे पालन करून एका विशिष्ट पद्धतीने वागणे किंवा लिहिणे. हे अनौपचारिक या शब्दाच्या विरुद्ध आहे, जो अधिक आरामशीर आणि व्यक्तिगत असतो. औपचारिकतेमध्ये योग्य शब्द निवडणे, आदरपूर्वक आणि संक्षिप्त भाषेत संवाद साधणे तसेच शिस्तबद्ध रचना राखणे समाविष्ट आहे. थोडक्यात, औपचारिक म्हणजे कोणत्याही गोष्टीमध्ये एक प्रकारची शिस्त, पद्धतशीरपणा आणि नियमांचे पालन करणे होय.

************

शब्दस्पर्शी–सुनील शिरपुरे
कमळवेल्ली,यवतमाळ
भ्रमणध्वनी–७०५७१८५४७९

# 'तेजस्वी' चेहरा

२०२५ च्या निवडणुकीच्या राजकारणामध्ये सर्वात जास्त चर्चा होणार्या बिहार विधानसभा निवडणुकीच्या तारखांची घोषणा अद्याप झाली नसली, तरी वातावरण मात्र चांगलेच गरम झाले आहे. राष्ट्रीय जनता दलाचे नेते आणि मुख्यमंत्री पदाचे प्रबळ दावेदार तेजस्वी यादव यांनी बिहारमध्ये सर्व २४३ जागांवर राष्ट्रीय जनता दल निवडणूक लढवू शकतो अशी घोषणा केल्यामुळे बहुचर्चित महागठबंधनच्या अस्तित्वाबाबत काही शंका निर्माण होत आहेत. अर्थात, बिहारमधील मुझफ्फरपूर येथे एका महत्त्वाच्या राजकीय सभेमध्ये बोलताना तेजस्वी यादव यांनी ज्या प्रकारे सर्व २४३ जागांवर तेजस्वी यादव उभा आहे, असे गृहीत धरूनच मतदारांनी पाठिंबा द्यावा असे वक्तव्य केले, त्याला एक वेगळा अर्थही आहे.

राष्ट्रीय जनता दलाला सर्व २४३ जागा लढायच्या आहेत हा त्याचा वरवरचा अर्थ असला, तरी महागठबंधनच्या राजकारणामध्ये उमेदवार कोणीही असला तरी माझा चेहरा समोर ठेवूनच सर्व मतदारसंघांमध्ये मतदान करावे, असे अप्रत्यक्षपणे तेजस्वी यादव यांनी मतदारांना सुचित केले आहे. बिहारमधील गेल्या पंधरा वर्षांच्या राजकारणामध्ये तेजस्वी यादव यांचा राजकीय प्रभाव वाढत चालला आहे हे नाकारण्याचे कारण नाही. राष्ट्रीय जनता दलाचे नेते आणि माजी मुख्यमंत्री लालूप्रसाद यादव यांचा खरा राजकीय वारसा सांभाळणार्या तेजस्वी यादव यांनी आपल्या पक्षालाही चांगली प्रतिष्ठा मिळवून दिली. त्यांच्या नेतृत्वाखाली विधानसभा निवडणुकीमध्ये राष्ट्रीय जनता दलाने चांगली कामगिरीही आतापर्यंत केली आहे. गेल्या विधानसभा निवडणुकीमध्ये १४३ जागा लढवून राष्ट्रीय जनता दराने ७५ म्हणजे सर्वात जास्त जिंकल्या होत्या. तेजस्वी यादव यांच्या चेहर्याची आणि त्यांच्या शैलीची बिहारमध्ये क्रेझ आहे हे नाकारता येत नाही. पण गेल्या काही दिवसांपासून काँग्रेसचे नेते राहुल गांधी आणि इतर नेते ज्या प्रकारे बिहारमध्ये कॅम्पेनिंग करत आहेत ते पाहता मुख्यमंत्रिपदाचा चेहरा म्हणून तेजस्वी यादव यांची घोषणा त्यांना मान्य असेल का, हेसुद्धा पहावे लागेल. बिहारमधील काँग्रेसच्या नेत्यांच्या म्हणण्याप्रमाणे, काँग्रेसने निवडणूक आयोगाला लक्ष्य करून मतचोरीचा जो विषय समोर आणला आणि बिहारमध्ये ज्या विविध प्रकारच्या रॅली काढल्या त्यामुळे सरकार विरोधी वातावरण तयार झाले आहे.

महागठबंधनमध्ये काँग्रेसचा सुद्धा वाटा महत्त्वाचा असावा अशी बिहारमधील काँग्रेस नेत्यांचीही अपेक्षा आहे. गेल्या विधानसभा निवडणुकीमध्ये काँग्रेसने फक्त ७० जागा लढवल्या होत्या आणि त्यापैकी १९ जागांवरच काँग्रेसला विजय मिळवता आला होता. बिहारमध्ये काँग्रेसचा तेथील स्थानिक नेता राज्याचा चेहरा म्हणून समोर येत नसला तरी राहुल गांधी यांचा चेहरा या निवडणुकीसाठी वापरण्याचे धोरण काँग्रेसने पत्करले आहे. गेल्या आठवड्यात बिहारमध्ये झालेल्या एका पत्रकार परिषदेमध्ये राहुल गांधी यांना जेव्हा मुख्यमंत्रिपदाचा चेहरा कोण, असा प्रश्न विचारला असता त्यांनी त्या प्रश्नाचे उत्तर टाळले होते.

याच पार्श्वभूमीवर आता तेजस्वी यादव यांनी आपल्या ताज्या राजकीय सभेमध्ये बिहारमध्ये सर्व जागांवर तेजस्वी यादवच उभे आहेत असे गृहीत धरून मतदान करा, हे जे आवाहन केले आहे त्याचा अर्थ मुख्यमंत्रिपदाचा चेहरा मीच आहे हे गृहीत धरा हाच होऊ शकतो.

# वीज वितरण कंपनीच्या गलथान कारभारामुळे माझ्या स्वतःच्या व माझ्या कुटुंबाच्या मालकीच्या ऊसाचे झाले नुकसान-जयदत्त गलांडे

केज/प्रतिनिधी वीज वितरण कंपनीच्या गलथान कारभारामुळे माझ्या स्वतःच्या व माझ्या कुटुंबाच्या मालकीच्या ऊसाचे नुकसान झालेले आहे अशा आशयाचे लेखी निवेदन केज तहसीलदार यांना जयदत्त गलांडे यांनी दिले आहे. याबाबतची सविस्तर माहिती अशी की, जयदत्त कल्याणराव गलांडे रा.चिंचोली माळी ता.केज यांचे व त्यांच्या कुटुंबाच्या नावे सारुकवाडी शिवारात स.नं.१ मध्ये पाच एकर उसाचे पीक आहे या उसाच्या पिकातून वीज वितरण कंपनीच्या वेगवेगळ्या दोन लाईटच्या लाईन गेलेल्या आहेत. त्या संदर्भाने जयदत्त गलांडे यांनी महावितरण कंपनी केज यांना दिं.१९ ऑगस्ट रोजी, लेखी निवेदन दिले होते की, त्यांच्या शेतामध्ये उसाचे पीक असून यामधून ११ केव्हीच्या दोन लाईनवर एल.टी. लाईनची एक लाईन गेलेली आहे व एल. टी.लाईन विद्युत प्रवाहाच्या तारा ह्या पूर्णपणे खाली लोबकळलेल्या आहेत. सदर वीज प्रवाहाच्या तारा या निकामी होऊन जीर्ण झालेल्या आहेत. विद्युत प्रवाहाच्या तारा वाऱ्यामुळे उसाच्या पनाट्यात अडकत आहेत तसेच या लाईन मुळे गलांडे यांचे मोठे आर्थिक नुकसान होऊ शकते असे वेळोवेळी महावितरण कार्यालयाच्या अधिकारी व कर्मचारी यांना गलांडे यांच्या मोबाईल दूरध्वनी वरून व प्रत्यक्ष भेटून संपर्क करून संबंधित काम वेळेत त करण्याची वारंवार विनंती केली आहे परंतु महावितरण कार्यालयाचे अधिकारी व कर्मचारी यांच्याकडून सतत टाळाटाळ करण्यात येत आहे. महावितरण चे लाईनमन हे सातत्याने जयदत्त गलांडे यांनी संपर्क केला असता उद्धट पणे आर्वाच्च भाषेचा वापर करून बोलत आहेत. गलांडे यांच्या व त्यांच्या कुटुंबाच्या होणाऱ्या आर्थिक नुकसान टाळण्यासाठी नुकसान होण्याअगोदर काळजी घ्यावी व लाईनची दुरुस्ती करण्यात यावी. त्यानंतर गलांडे यांनी उपअभियंता साहेब व संबंधित लाईनमन साहेब यांना वारंवार संपर्क करून सदर लाईटची लाईन दुरुस्त करण्याची विनंती केली असताना सुद्धा आजपर्यंत नुसती चालढकल करण्यात आली आहे त्याचबरोबर संबंधित लाईनमन साहेब माझ्या विरोधात वरिष्ठांना खोटी माहिती देऊन सभ्रम निर्माण करून माझ्या नुकसानीस कारणीभूत ठरत आहेत. दिनांक ११ सप्टेंबर रोजी रात्री ११-०० वाजता ११ केव्हीची तार तुटून त्यांच्या उसामध्ये पडल्यामुळे




अक्षरशा उभे असलेले ऊस जळाला आहे. संबंधित शेतकऱ्याचे नशीब मोठे की, सदर ताळ तुटण्याआधीच एक ते दोन तासाने जोराचा पाऊस झाल्यामुळे बाकीचा होणारा अनर्थ टळला आहे परंतु सदर वीजपुरवठा करणाऱ्या तारापासून आमच्या शेतातील उसाच्या पिकासह ड्रीपचे नुकसान होण्याची शक्यता नाकारता येत नाही जर भविष्यात सदर विद्युत पुरवठा करणाऱ्या तारा मुळे जयदत्त गलांडे यांच्या व त्यांच्या कुटुंबाचे आर्थिक नुकसान झाल्यास त्यास सर्वस्वी जबाबदारी ही महावितरण कार्यालयाची राहील. तसेच गलांडे यांचा पाच एकर ऊस जळून खाक झाला असता व वरिष्ठांना माहिती दिली असताना उपअभियंता साहेब हे वरिष्ठांना खोटी माहिती देत आहेत त्यांना वेळोवेळी संपर्क केलेले चे गलांडे यांच्याकडे पुरावे उपलब्ध आहेत व त्यांच्या निष्काळजी व हलगर्जीपणामुळे गलांडे या शेतकरी कुटुंबाचे मोठे नुकसान झाले असते व त्यांच्यासह त्यांच्या कुटुंबावर आत्महत्या करण्याची वेळ आली असती अशा आशयाचे लेखी निवेदन जयदत्त गलांडे यांनी तहसीलदार केज, मुख्य कार्यकारी अभियंता लातूर, अधिक्षक अभियंता बीड, कार्यकारी अभियंता अंबेजोगाई, उप अभियंता केज यांना दिले आहे. जयदत्त गलांडे यांनी दिलेल्या निवेदनाची तहसीलदार केज यांनी दखल घेत चिंचोली माळी मंडळ अधिकारी यांना लेखी आदेश देऊन सदर प्रकरणी तात्काळ पंचनामा करून अहवाल सादर करण्याचे आदेशित केले असता मंडळ अधिकारी यांनी घटनास्थळी जाऊन पंच यांच्या समक्ष पंचनामा करून तहसीलदार यांना अहवाल सादर केला. सदरच्या अहवालात म्हटले की, मौजे सारुकवाडी येथील जयदत्त कल्याणराव गलांडे यांच्या स.नं.१ मध्ये उसाच्या शेतामध्ये पाच एकर क्षेत्रामध्ये विद्युत तार पडून उसाचे अंशतः नुकसान झाल्याचे दिसून आले भविष्यात सदर विद्युत तारेमुळे वित्तहानी व जीवित हानी होण्याची शक्यता नाकारता येत नाही त्यामुळे सदर विद्युत तारेस गार्ड बसविणे आवश्यक आहे असे नमूद करण्यात आले आहे व तसा अहवाल चिंचोली माळी मंडळ अधिकारी यांनी तहसीलदार यांना सादर केला आहे.

# शिवकालीन रणरागिणींच्या स्मृती जागवणारा प्रेरणादायी सोहळा रवींद्र मालुसरे राज्यस्तरीय पुरस्काराने सन्मानित

मुंबई / प्रतिनिधी :- छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळातील रणरागिणींचा पराक्रम आणि स्त्रीशक्तीची परंपरा नव्या पिढीपुढे उभी करण्यासाठी श्री शिवाजी ज्ञानपीठ इंटरनॅशनल आणि मराठी साहित्य व कला सेवा यांच्या संयुक्त विद्यमाने दादरच्या श्री शिवाजी मंदिर नाट्यमंदिरात वार्षिक सोहळा शेकडो विद्यार्थी, पालक आणि शिवप्रेमींच्या उपस्थितीने उत्साहात पार पडला. कार्यक्रमाच्या सुरुवातीला विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या सांस्कृतिक कार्यक्रमाने उपस्थित प्रेक्षकांना आनंद दिला. सुप्रसिद्ध इतिहास अभ्यासक-लेखक प्रवीण भोसले यांनी प्रमुख पाहुणे म्हणून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. ते म्हणाले, शिक्षणाचा उपयोग केवळ प्रमाणपत्रापुरता न राहता दैनंदिन आयुष्यात आणि आवडीच्या क्षेत्रात कर्तबगारी दाखवण्यासाठी करावा.वैयक्तिक आयुष्यात शिक्षणाची पात्रता सिद्ध करायला लागते. आज तुमचा शिक्षणाचा टप्पा पूर्ण झाला आहे, घेतलेल्या शिक्षणाचा रोजच्या व्यवहारात वापर कसा करणार आहात, हे जसे खरे आहे तसेच तुम्हाला इतर ज्या क्षेत्रात आवड आहे त्यात तुमचे अंगीकृत गुण दाखवत यशस्वी जीवनाला सामोरे जावे लागणार आहे. शिवरायांचे आठवावे रूप, आठवावा प्रताप - असे म्हणताना इतिहासाच्या पानांवर कोरलेल्या रणरागिणी डोळ्यासमोर येतात. मातोश्री जिजाबाई, महाराणी येसूबाई, ताराराणी, यलम्मा, पुण्यश्लोक अहिल्याबाई, विरांगणा रायबागन या स्त्रिया भावनांवर विजय मिळवत प्रत्येक आव्हानाला सामोरे जात होत्या. त्या स्वराज्यसेवक वीरांचा आधार होत्या आणि अप्रत्यक्षपणे स्वराज्यासाठी लढत होत्या. आजही स्त्रिया पुरुषांच्या बरोबरीने प्रत्येक क्षेत्रात पुढे आहेत. तुम्हीही त्यांचा आदर्श घ्यावा. विशेष पाहुणे म्हणून उपस्थित एनएसजी कमांडो नरेश पवार यांनी आपल्या लष्करी अनुभवांची माहिती दिली. ते म्हणाले, पठाणकोट हल्ला, जम्मू-काश्मीरमधील कारवाया, पुंछ येथे




बॉर्डरपार ऑपरेशन - सलग तीन वर्षे पाकिस्तानविरोधात कार्य करताना आम्ही अनेक संकटांना सामोरे गेलो. नुकतेच यशस्वी झालेले सिंदूर ऑपरेशन जाहीर करणाऱ्या कर्नल सोफिया कुरेशी आणि विंग कमांडर व्योमिका सिंग या दोन धाडसी महिला होत्या. घेतलेल्या शिक्षणाचा उपयोग सैन्यदलासाठीही करता येतो, प्राधान्याने देशसेवा करता येईल त्या दृष्टीने प्रयत्न करावेत. छत्रपती शिवाजी महाराजांचे सिद्धांत समाजकार्याचा पाया ठरावेत, या ध्येयाने कार्य करणाऱ्यांना दिला जाणारा सुभेदार वीर तानाजी मालुसरे सन्मान पुरस्कार २०२५ मराठी वृत्तपत्र लेखक संघ मुंबईचे अध्यक्ष आणि इतिहास अभ्यासक रवींद्र मालुसरे यांना प्रदान करण्यात आला. सत्काराला उत्तर देताना ते म्हणाले, स्वराज्य हे शहाजी राजे आणि राजमाता जिजाऊ माँसाहेब यांचे स्वप्न होते. छत्रपती शिवाजी महाराजांनी ते सत्यात उतरवले, संभाजी महाराजांनी त्याचा विस्तार केला. या यज्ञात असंख्य मावळ्यांनी प्राणांची आहुती दिली. त्यांच्या बलिदानामुळे महाराष्ट्र धर्म काय असतो हे जगाला कळाले. या इतिहासाचा विसर मराठी माणसाला पडता कामा नये. मालुसरे कुळात जन्म झाल्याने सुभेदारांचा इतिहास पुढे आणणे हे मी कर्तव्य समजतो आहे. संस्थेचे प्रमुख डॉ. हेमंतराजे गायकवाड यांनी संस्थेचे योगदान अधोरेखित केले. ते म्हणाले, बारावीनंतर मुलींनी स्वावलंबी व्हावे, ही संकल्पना घेऊन मी डॉ. गायकवाड इन्स्टिट्यूट सुरू केले. आज ते पॅरामेडिकल क्षेत्रात देशभरात महत्त्वाचे स्थान मिळवून आहे. होमगार्ड प्रमुख म्हणूनही काम केल्यामुळे त्या कठोर शिस्तीमुळे अनेक मुली माझ्यावर बापासारखा विश्वास ठेवतात. तसेच, छत्रपती शिवाजी महाराजांचे जीवनकार्य देशातील विविध भाषांमध्ये पोहोचवण्यासाठी त्यांनी श्री शिवाजी ज्ञानपीठ इंटरनॅशनलची स्थापना केली असल्याचेही त्यांनी सांगितले. छत्रपती शिवाजी महाराज ते छत्रपती राजाराम महाराज या काळातील इतिहास मी ग्रंथरूपाने इंग्रजी-मराठीसह इतर भाषामध्ये प्रकाशित केला आहे. सोहळ्याच्या निमित्ताने आयोजित राज्यस्तरीय शिवकालीन रणरागिणी निबंध स्पर्धेतील विजेत्यांना गौरविण्यात आले. डॉ. अनुज अविनाश केसरकर, मुंबई (प्रथम क्रमांक), प्रा. प्रशांत पुंडलिक शिरुडे, ठाणे (द्वितीय क्रमांक), सुमिता अभिषेक पवार, मुंबई (तृतीय क्रमांक ), स्नेहल गोविंद चव्हाण, रत्नागिरी आणि हिमांशू विजय शुक्ल, जळगाव (उत्तेजनार्थ ) यांना सन्मानचिन्ह, सन्मानपत्र व पुष्पगुच्छ देऊन गौरविण्यात आले.कार्यक्रमाला मराठी वृत्तपत्र लेखक संघ मुंबईचे माजी अध्यक्ष विजय ना कदम, ज्येष्ठ पत्रकार राजन देसाई, ज्येष्ठ वृत्तपत्र लेखक दिलीप दळवी, रामचंद्र जयस्वाल, राजेंद्र मालुसरे, जयवंत मालुसरे, संजय धामापूरकर, अजय नागवेकर उपस्थित होते. सोहळ्याचे सूत्रसंचालन मराठी साहित्य व कला सेवाचे संस्थापक अध्यक्ष गुरुदत्त वाकदेकर, युक्ता गोठणकर आणि आरती लोखंडे यांनी केले. आर्णा सुर्वे, साक्षी निर्मल, गौरव गायकवाड, समिक्षा बिळीगुदरी आणि साहिल धाकतोडे यांनी कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी विशेष परिश्रम घेतले.

## खा. बजरंग सोनवणे यांचे खंदे समर्थक, गोविंद ससाणे यांचा उपमुख्यमंत्री यांच्या उपस्थितीत ग्राम पंचायत सदस्यांसह आडसकर गटात जाहिर प्रवेश.

केज! प्रतिनिधी खा. बजरंग सोनवणे यांचे खंदे समर्थक सोनीजवळा गावचे सरपंच गोविंद ससाणे यांनी त्यांच्या सहकार्यासह अजित पवार ( राष्ट्रवादी ) गटात जाहिर प्रवेश केला आहे. राज्याचे उपमुख्यमंत्री मा.अजित (दादा) पवार यांच्या उपस्थितीत व राष्ट्रवादी अजित पवार गटाचे जेष्ठ नेते मा. रमेशराव आडसकर यांच्या नेतृत्वा खाली सोनी जवळा गावचे सरपंच गोविंद ससाणे, यांनी त्यांचे सहकार्य सह राष्ट्रवादी अजित पवार गटामध्ये रमेश आडसकर साहेबांचे नेतृत्वा खाली जाहीर प्रवेश केला आहे यावेळी पत्रकार परिषदेत बोलताना सोनी जवळा गावचे सरपंच, गोविंद ससाणे यांनी सांगितले कि मी पुर्वी खा. बजरंग बप्पा सोनवणे यांच्या नेतृत्वा खाली अतिशय इमानदारी ने काम केले परंतु खासदारांच्या जवळच्या, बडव्यांनी माझ्या विरोधात काम केले, प्रसंगी कांहीनी माझ्या विषयी अपशब्द वापरले, मी गावचा सरपंच झाल्यापासून गावची एकही तक्रार पोलिस स्टेशन ला जावू दिली नाही, परंतु माझ्या गावच्या विकास कामांचा विकासात्मक निधी खासदार साहेबांच्या बगल बच्चांनी माझ्याकडे येवू दिला नाही मी गावच्या विकासासाठी आदरणीय रमेशराव आडसकर साहेबांच्या नेतृत्वा खाली राज्याचे उप मुख्य मंत्री मा. अजीत (दादा ) पवार यांच्या उपस्थितीमध्ये अजीत पवार(राष्ट्रवादी) पक्षात जाहिर प्रवेश करत आहे. मी खा. बजरंग सोनवणे यांच्या जवळ असताना मोर्चे, आंदोलने यामध्ये उत्स्फुर्त सहभाग घेतला तसेच वेळोवेळी त्यांचा आदेश सर्वस्व मानून प्रामाणिक पणे काम केले परंतु खासदारांच्या जवळचे बडवे,टवाळखोर यांच्या त्रासाला कंटाळून खासदार बप्पांची साथ सोडून राष्ट्रवादी अजित पवार गटात प्रवेश करत आहे. तसेच मी निवडणूक वगैरे लढवणार नसून फक्त माझा गाव आणि गावच्या विकासा वर लक्ष केंद्रित करणार असून मी कोणाच्या कुठल्याही आमिषाला बळी न पडता आडसकर साहेबांच्या नेतृत्वा खाली त्यांच्या विश्वासाला तडा न जावू देता संधीचे सोने करत गावचा विकास करणार आहे. खासदार साहेबांच्या अवती भोवती असणारे बगलबच्चे लोकांना कंटाळून जवळचे लोक त्यांची साथ सोडत आहेत अशा गोष्टीकडे खासदार साहेबांनी लक्ष द्यायला हवे.

## भैय्यासाहेब आंबेडकर स्मृतिदिन, भन्ते व पेरियार जयंतीनिमित्त लातूरमध्ये अभिवादन





लातूर :- स्वाभिमानी,संघर्षशील आणि समाजाच्या हक्कासाठी अखंड आयुष्यभर झगडणारे यशवंत तथा भैय्यासाहेब भीमराव आंबेडकर यांच्या स्मृतिदिनानिमित्त व भन्ते अनागारिक भन्तेजी आणि पेरियार रामास्वामी यांच्या जयंतीनिमित्त लातूर येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर पार्क येथे विश्वरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक जयंती उत्सव समिती २०२५ च्या वतीने अभिवादन करण्यात आले. यावेळी विश्वरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक जयंती उत्सव समितीचे अध्यक्ष सुशीलकुमार चिकटे,बाबासाहेब कांबळे,डी.उमाकांत,आकाश सरवदे,वैभव गायकवाड, सिध्दांत चिकटे यांच्यासह भारतीय बौद्ध महासभेच्या लातूर जिल्हाध्यक्षा आशाताई चिकटे,भारतीय बौद्ध महासभेचे पदाधिकारी,सचिन गायकवाड,सुजाता अजनिकर व अन्य मान्यवर उपस्थित होते.

## माजी मंत्री, आ. अमित देशमुख यांनी मराठवाडा मुक्तीसंग्राम दिनी हुतात्मा स्मारक स्मृतिस्तंभास आदरांजली अर्पन केली

लातूर / प्रतिनिधी :- राज्याचे माजी वैद्यकीय शिक्षण व सांस्कृतिक कार्यमंत्री तसेच लातूर जिल्ह्याचे माजी पालकमंत्री, आमदार अमित विलासराव देशमुख यांनी मराठवाडा मुक्तीसंग्राम दिनी आज, बुधवार, १७ सप्टेंबर रोजी सकाळी लातूर येथील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर पार्क येथे जाऊन हुतात्मा स्मारक स्मृतिस्तंभास पुष्पचक्र अर्पण करून विनम्र अभिवादन केले. यावेळी खासदार डॉ. शिवाजी काळगे, लातूर जिल्हा बँकेचे अध्यक्ष तथा माजी आमदार धीरज देशमुख यांच्यासह विविध संस्थांच्या पदाधिकाऱ्यांनी मराठवाडा मुक्ती संग्राम लढ्यात हौतात्म्य पत्करलेल्या



शूरवीरांना आदरांजली वाहिली. आमदार अमित देशमुख यांनी सर्वांना मराठवाडा मुक्ती संग्राम दिनाच्या शुभेच्छा दिल्या. यावेळी लातूर जिल्हा काँग्रेसचे अध्यक्ष अभय साांळुके, लातूर जिल्हा काँग्रेसचे अध्यक्ष ड. किरण जाधव, माजी जिल्हाध्यक्ष श्रीशैल उटगे, व्हा.चेअरमन प्रमोद जाधव, प्रविण पाटील, सर्जेराव मोरे, सुभाष घोडके, विजय देशमुख, एन.आर.पाटील, दगडूआप्पा मिटकरी, लक्ष्मण कांबळे, विजयकुमार पाटील, नारायण लोखंडे, गणपतराव बाजुळगे, इम्रान सय्यद, रमाकांत गडदे, फारूख शेख, प्रविण कांबळे, मारुती पांडे, सुरेश चव्हाण, अजित माने, सहदेव मस्के, राम स्वामी, कैलास कांबळे, सचिन सुर्यवंशी, सचिन पाटील, संजय ओव्हाळ आदी उपस्थित होते.

# मराठवाडा मुक्तीसंग्राम दिनी लातूर येथे पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांच्या हस्ते ध्वजवंदन आपत्ती काळात राज्य शासन शेतकऱ्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे

लातूर :- गेल्या काही दिवसांपासून जिल्ह्यात सुरु असलेल्या अतिवृष्टीमुळे शेतपिकांचे मोठे नुकसान झाले आहे. नैसर्गिक आपत्तीमुळे निर्माण झालेल्या या संकटकाळात राज्य शासन शेतकऱ्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे आहे. नुकसानीची भरपाई लवकरात लवकर देण्यासाठी शासन स्तरावर आवश्यक कार्यवाही गतीने केली जाईल, अशी ग्वाही राज्याचे सार्वजनिक बांधकाम मंत्री तथा लातूर जिल्ह्याचे पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी दिली. मराठवाडा मुक्तिसंग्राम दिनानिमित्त लातूर येथील हुतात्मा स्मारक स्मृतीस्तंभ येथे पालकमंत्री श्री. भोसले यांच्या हस्ते राष्ट्रध्वज वंदन करण्यात आले. प्रारंभी पालकमंत्र्यांनी हुतात्मा स्मारक स्मृतीस्तंभास पुष्पचक्र अर्पण करून अभिवादन केले. पोलीस दलातर्फे शस्त्र सलामी, मानवंदनेनंतर ध्वजवंदन करण्यात आले. जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे, पोलीस अधीक्षक अमोल तांबे, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी राहूल कुमार मीना, लातूर शहर महानगरपालिका आयुक्त श्रीमती मानसी, अपर जिल्हाधिकारी शिल्पा करमकर, अपर पोलीस अधीक्षक मंगेश चव्हाण यांच्यासह स्वातंत्र्य सेनानी, त्यांचे कुटुंबिय, माजी सैनिक, पत्रकार, अधिकारी, कर्मचारी व नागरिक यावेळी मोठ्या संख्येने उपस्थित होते. अतिवृष्टीमुळे जिल्ह्यात प्रमुख शेतपिकांचे नुकसान झाले असून, घरांची पडझड, शेतजमीन खरडून गेली आहे. या नुकसानीचे पंचनामे गतीने सुरू असून शेतकऱ्यांना लवकरात लवकर नुकसान भरपाई देण्याची कार्यवाही केली जाईल. पुढील काही दिवसांत आणखी पाऊस पडण्याचा अंदाज वर्तवण्यात आला आहे. या संकटाचा सामना करण्यासाठी प्रशासन सतर्क असून नागरिकांना आवश्यक मदत करण्यात येत आहे. यासाठी जिल्ह्यात ३०० आपदा मित्र स्वयंसेवक प्रशिक्षित करण्यात





आले असल्याचे पालकमंत्री श्री. भोसले यांनी सांगितले. मराठवाडा मुक्तिसंग्राम दिन हा भारतीय स्वातंत्र्याच्या पूर्णत्वाचा दिवस आहे. मराठवाडा मुक्तिलढ्यात लातूरकरांचे अमूल्य योगदान आहे. रझाकार आणि निजाम सैन्याविरुद्ध लातूर जिल्ह्यात औराद, निलंगा, हाडोळी, बोटकुल, हत्तीबेट, रामघाट, अंबुलगा, तोंडचीर आणि घोणसी यासारख्या विविध ठिकाणी थरारक लढाया झाल्या. शेतकरी, विद्यार्थी, महिला, कामगार आदी सर्वांनीच या लढ्यात सहभाग घेतला. स्वामी रामानंद तीर्थ यांचा नेतृत्वाखाली लढल्या गेलेल्या मराठवाड्यातील जनतेच्या या लढ्याला भारताचे तत्कालीन गृहमंत्री सरदार वल्लभ पटेल यांच्या मध्यस्थीने यश मिळाले. १३ सप्टेंबर १९४८ रोजी पोलिस क्शन सुरू झाले आणि १७ सप्टेंबर १९४८ रोजी मराठवाडा निजामाच्या राजवटीतून मुक्त झाला. या गौरवशाली इतिहासाला साक्षी ठेवून जिल्ह्याच्या विकासाठी प्रयत्नशील असल्याचे पालकमंत्री श्री. भोसले यावेळी म्हणाले. र ा ज य शासनाच्या महसूल आणि वन विभागामार्फत १७ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर २०२५ या कालावधीत सेवा पंधरवडा राबवला जाणार आहे. या अंतर्गत पाणंद आणि शिवार रस्त्यांना क्रमांक देणे, नोंदणी, मोजणी आणि सीमांकनासह वादांचे निराकरण करण्यासाठी रस्ता अदालतीचे आयोजन होईल. 'सर्वांसाठी घरे' उपक्रमांतर्गत सरकारी जमिनीवर घरकुलांसाठी कब्जा हक्क, झोपडपट्टी अथवा अतिक्रमण नियमितीकरण आणि पात्र लाभार्थ्यांना पट्टे वाटप केले जाईल. नागरिकांना सुलभ सेवा देण्यासाठी नावीन्यपूर्ण उपक्रम राबवले जाणार आहेत. तसेच याच कालावधीत 'नमो नेत्र संजीवनी आरोग्य अभियान' संपूर्ण महाराष्ट्रात सुरू होत आहे. या अभियानात राज्यात दहा लाखांहून अधिक नागरिकांची मोफत नेत्र तपासणी, शस्त्रक्रिया आणि औषधोपचार केले जाणार आहेत. यासाठी जिल्हा आणि तालुका स्तरावर मोफत शिबिरांचे आयोजन केले जाईल. या उपक्रमामुळे गरजू आणि वंचितांना मोठा दिलासा मिळेल. विशेषतः ग्रामीण भागातील वृद्ध, शेतकरी, मजूर, महिला आणि ज्येष्ठ नागरिकांना नवदृष्टी मिळण्याचा मार्ग खुला होईल, असा विश्वास पालकमंत्री श्री. भोसले यांनी यावेळी व्यक्त केला. जिल्ह्यात सामाजिक न्याय आणि विशेष सहाय्य विभागामार्फत चालवल्या जाणाऱ्या २५ शासकीय वसतिगृहांमध्ये २ हजार ८४५ विद्यार्थ्यांची प्रवेश क्षमता मंजूर आहे. लातूर अतिरिक्त एमआयडीसी येथे बांधकाम पूर्ण झालेल्या इमारतीत २५० विद्यार्थ्यांसाठी आणि यापूर्वी कार्यरत वसतिगृहांमध्ये आणखी १४५ विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यास राज्य शासनाने नुकतीच मान्यता दिली असल्याचेही पालकमंत्र्यांनी यावेळी सांगितले. यावेळी पालकमंत्री श्री. भोसले यांच्या हस्ते प्रातिनिधिक स्वरुपात कुणबी जात प्रमाणपत्राचे वितरण करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन उद्धव फड यांनी केले. 'मराठवाडा मुक्तिलढा' कॉफीटेबल बुकचे प्रकाशन मराठवाडा मुक्तिसंग्रामाच्या लढ्यातील महत्वपूर्ण घटनांच्या छायाचित्रांचा समावेश असलेल्या 'मराठवाडा मुक्तिलढा' या कॉफीटेबल बुकचे प्रकाशन पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांच्या हस्ते करण्यात आले. मराठवाडा मुक्तिलढ्याचा जाज्वल्य इतिहास पुढील पिढीपर्यंत पोहचविण्यासाठी जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांच्या संकल्पनेतून आणि मार्गदर्शनाखाली जिल्हा प्रशासनाने ही सचित्र पुस्तिका तयार केली आहे. इतिहास अभ्यासक विवेक सौताडेकर आणि भाऊसाहेब उमाटे या पुस्तिका निर्मितीत महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे.

# सेवाकार्याच्या माध्यमातून सशक्त व निरोगी समाजनिर्मिती व्हावी - पालकमंत्री शिवेंद्रराजे भोसले

## पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त शहर जिल्हा भाजपच्या रक्तदान शिबिराला उत्सफुर्त प्रतिसाद

लातूर /प्रतिनिधी :- पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शोषित व वंचित घटकांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी सेवा परमो धर्म या तत्वाचा अवलंब करत केंद्र सरकारच्या माध्यमातून कार्य केले आहे. भारतीय जनता पक्षाची विचारधारा सुद्धा सेवा परमो धर्म हीच असल्याने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त सेवा पंधरवाड्याचे आयोजन करण्यात आलेले आहे. या पंधरवाड्यात सेवा कार्याच्या माध्यमातून सशक्त व निरोगी समाजनिर्मिती व्हावी अशी अपेक्षा पालकमंत्री शिवेंद्रराजे भोसले यांनी व्यक्त केली.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त दि १७ सप्टेंबर ते ०२ ऑक्टोबर यादरम्यान शहर जिल्हा भाजपच्या वतीने सेवा पंधरवाडा अभियानाचे आयोजन करण्यात आले आहे. या अभियानाचा शुभारंभ गंजगोलाई परिसरात रक्तदान शिबिराच्या उद्घाटनाने करण्यात आला. यावेळी उद्घाटक म्हणून पालकमंत्री शिवेंद्रराजे भोसले बोलत होते. याप्रसंगी शहर जिल्हाध्यक्ष अजित पाटील कव्हेकर, अभियानाच्या प्रदेश सहसंयोजिका तथा प्रदेश प्रवक्ता प्रेरणा होनराव, अर्चना पाटील चाकूरकर, माजी शहर जिल्हाध्यक्ष देविदास काळे, सरचिटणीस मीना भोसले, ॲड. दिग्विजय काथवटे, शहर जिल्हा अभियान संयोजक अमोल गीते, सहसंयोजक संजय गिर, रविशंकर लवटे आदी उपस्थित होते.

भाजपाने अंत्योदय विकास हाच विचार जोपासत आपले पक्षकार्य सातत्याने पुढे नेले असल्याचे सांगत पालकमंत्री शिवेंद्रराजे भोसले म्हणाले कि, समाजातील प्रत्येक घटकांना केंद्र व राज्य सरकारच्या विविध योजनांचा लाभ मिळावा यासाठी केंद्र व राज्य





सरकारने विशेष लक्ष दिलेले आहे. प्रामुख्याने शोषित आणि वंचित घटकांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी विशेष सुचना देऊन त्यादृष्टीनेच केंद्र व राज्य सरकारची वाटचाल सुरु ठेवण्यास सांगितले आहे. सेवा परमो धर्म या तत्वाचा अवलंब करत भाजपसह केंद्र व राज्यातील भाजपाप्रणीत सरकारने आपले काम सुरु ठेवले असल्यामुळे आज अनेकांना विविध योजनांचा फायदा होत आहे. त्याचबरोबर त्यांच्या आरोग्याची काळजी घेण्यासाठीही विविध उपक्रम सुरु केले असून अनेक योजनाही अंमलात आणलेल्या आहेत. त्यामुळे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त सेवा पंधरवाडा अभियान आयोजित केलेले असून या अभियानाच्या माध्यमातून लातूर शहर जिल्हा भाजपाने सशक्त व निरोगी समाज निर्मिती करण्यासाठी उपक्रम राबवावेत अशी अपेक्षा व्यक्त केली.

पंतप्रधान नरेंद्र मोदी व मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी निस्वार्थपणे कार्य करत समाजातील प्रत्येक घटकाला वेगवेगळ्या योजनेच्या माध्यमातून सशक्त करण्यासाठी प्रयत्न करत असल्याचे सांगून शहर जिल्हाध्यक्ष अजित पाटील कव्हेकर म्हणाले की, पंतप्रधान नरेंद्र मोदी व मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या निस्वार्थी कार्याचा आदर्श डोळ्यासमोर ठेऊन शहर जिल्हा भाजपातील पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी कार्य करावे असे आवाहन केले. सेवा पंधरवाडा अभियानाच्या माध्यमातून लातूरमध्ये प्रत्येक समाजाशी जोडले जाण्याची संधी आपल्या सर्वांना प्राप्त झालेली असून या संधीचे सोने करत आगामी महापालिका निवडणुकीसाठी पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी मोर्चेबांधणी करावी, अशी अपेक्षा व्यक्त केली. या सेवा पंधरवाड्यात विविध उपक्रम राबवण्यात येत असून या उपक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रत्येकाने योगदान द्यावे असे आवाहन केले.

रक्तदान शिबिराच्या उद्घाटनापुर्वी पालकमंत्री शिवेंद्रराजे भोसले यांच्या हस्ते जगदंबा देवीची महाआरती करून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या निरोगी व उदंड आयुष्यासाठी प्रार्थना केली. या रक्तदान शिबिरात १२६ जणांनी रक्तदान करून आपला सेवा धर्म निभावला. या रक्तदान शिबिराच्या उद्घाटनाप्रसंगी शिबिराचे संयोजक ओम धरणे, पवन आल्टे, निखील गायकवाड, गोविंद सुर्यवंशी यांच्यासह मंडल अध्यक्ष निर्मला कांबळे, सुरेश जाधव, राहुल भुतडा, विशाल हावा पाटील, रोहित पाटील, सचिन सुरवसे, महिला मोर्चा अध्यक्षा रागिणी यादव, माजी परिवहन सभापती मंगेश बिरादार, श्वेता लोंढे, स्वाती घोरपडे, शोभा पाटील, शितल मालू, देवानंद साळुंके, संगीत रंदाळे, गोरोबा गाडेकर, मधुसूदन पारीख, ॲड.ललित तोष्णीवाल, प्रमोद गुडे, बालाजी शेळके, धनंजय हाके, आबासाहेब चौगुले, शिवसिंह सिसोदिया, गणेश हेड्डा, विनय जाकते, अजय भुमकर, श्रीराम कुलकर्णी, धनंजय साठे, मुन्ना हाश्मी, ॲड.गणेश गोजमगुंडे, महेश झंवर, ॲड.विजय आवचारे, महादेव कानगुले, अभिजित मदने, संतोष पांचाळ, ॲड.किशोर शिंदे, बालाजी गाडेकर, अर्चना आल्टे, भरत भोसले, शिवाजी कामले, मंदार कुलकर्णी, भरत लोंढे, राजन सोनवणे, अतिश कांबळे, ॲड. पंकज देशपांडे, स्वराज यादव, वैभव वनारसे, राजेश पवार, सहदेव बिरादार, आकाश पिटले, किशोर कवडे, पवन आल्टे, गणेश खाडप, गौरव यादव, संतोष तिवारी, गजेंद्र बोकन, शैलेश भडीकर, बाबा गायकवाड, हेमा येळे, सीमा करपे, गणेश कसबे, अमजद पठाण, सचिन मदने, प्रीतम मुंडलिक, चैतन्य फिस्के, करण हाके आदींसह पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या जीवनावर आज दाखवणार चित्रफीत

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त शहर जिल्हा भाजपच्या वतीने आज गुरुवार दि. १८ सप्टेंबर रोजी लातूर शहरातील पी.व्ही.आर. टॉकिज येथे पंतप्रधान मोदी यांच्या जीवनावर आधारित चित्रफित दाखवण्यात येणार आहे. संध्याकाळी ०६:३० वाजता दाखवण्यात येणाऱ्या ही चित्रफित बघण्यासाठी शहर जिल्हा भाजपच्या पदाधिकाऱ्यांकडे संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आलेले आहे.

# समाजभूषण उत्तमराव तरकसे आसाम मेघालय राज्याच्या दौऱ्यावर...!

आसाम :- आसाम राज्यातील गुहाटी दिसपूर लगत असलेला गोलपारा, नालबारी,कामरूप व भोंगाईगाव अशा बहुतांश जिल्ह्यातील उदाहरणार्थ नालबारी जिल्ह्यातील मुंकलबलआ,कुरीमारी मधील शालिमार तालुका भुंगाहार या तालुक्यातील जवळजवळ प्रत्येक तालुक्यात शे ते दिडशे गावात आजही दळणवळणासाठी सहा महिन्याकरिता बोटीचाच वापर करावा लागतो कारण सदरचा भूप्रदेश हा सकल असून ब्रह्मपुत्रा व इतर नद्यांनी आसाम मेघालय मधिल काही प्रदेश वेढलेला असल्याने सहा महिने सदरच्या भूप्रदेशात नदीच्या पाण्याच्या प्रवाहाने काही भुभागाचे संकलन होत असल्याने दळणवळणाकरिता पक्के रस्ते किंवा पूल बांधता येत नाही त्यामुळे बोटी शिवाय त्यांना सहा महिने तरी एका गावावरून दुसऱ्या गावाकडे दळणवळणासाठी बोटी शिवाय पर्यायच नाही तसेच



सदर भागातील रहिवाशांची घरे सुद्धा तात्पुरत्या स्वरूपात पत्र्याची किंवा पडव्याच्या काड्यां व ताग तसेच गवतानी उभारलेली असतात पण ती सुद्धा नदीच्या पुराने भूसंकलनामध्ये कधीही भूभागासह त्यांचा संसार वाहून जातो तेव्हा त्यांना दुसऱ्या ठिकाणी आपला संसार स्थलांतरित करावा लागते म्हणून ते पक्की घरे बांधत नाहीत समाजभूषण उत्तमराव तरकसे (महा शासनाच्या डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर समाजभूषण पुरस्काराने सन्मानित ज्येष्ठ कवी साहित्यिक विचारवंत) हे काही शासकीय कामानिमित्त नागालँड, मेघालय व आसाम राज्याच्या दौऱ्यावर असताना तेथील सामाजिक भौगोलिक, सांस्कृतिक ,शेतीविषयक व आंबेडकरी चळवळीचे सुद्धा त्यांनी अवलोकन केले आहे

# महाराष्ट्रात ओला दुष्काळ जाहीर करा

मुंबई : प्रतिनिधी

राज्यात ऑगस्ट आणि सप्टेंबर महिन्यात झालेल्या अतिवृष्टीने तब्बल ३० जिल्ह्यात नुकसान झाले आहे. राज्यातील १७ लाख ८५ हजार ७१४ हेक्टर इतके क्षेत्र या पावसाने बाधित झाल्याने नुकसानीचे पंचनामे करून राज्यात ओला दुष्काळ जाहीर करावा अशी मागणी काँग्रेस विधिमंडळ पक्षाचे नेते विजय वडेट्टीवार यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस



यांना पत्र पाठवून केली आहे. मराठवाडा आणि विदर्भातील जिल्ह्यांना अतिवृष्टीचा मोठा फटका बसला आहे. सोयाबीन, मका, कापूस या पिकांचे नुकसान झाले आहे. अतिवृष्टीमुळे शेतक-यांचा रब्बी हंगाम धोक्यात येण्याची शक्यता आहे. त्यामुळे शेतक-यांना प्रति हेक्टरी ५० हजार रुपयांची मदत करावी. तसेच बँकेकडून शेतक-यांची होणारी वसुली थांबवावी. पिक विमा कंपन्यांनी तातडीने शेतक-यांना मदत करावी असेही वडेट्टीवार यांनी आपल्या पत्रात नमूद केले आहे.

# लातुरात जन सुरक्षा कायद्याला कडाडून विरोध महात्मा गांधी चौकात कृती समितीचा धरणे सत्याग्रह

लातूर : गेल्या पावसाळी अधिवेशनात महाराष्ट्र सरकारने सर्व विरोधी पक्ष व संघटनांना नेस्तनाबूत करण्यासाठी जन सुरक्षा कायदा मंजूर केला आहे. हा कायदा अतिशय घातक स्वरूपाचा असून जन सामान्यांना संविधानाने दिलेल्या अभिव्यक्ती स्वातंत्र्यावर घाला घालणार आहे. या जन सुरक्षा कायद्याच्या विरोधात आज १७ सप्टेंबर रोजी मराठवाडा मुक्ती दिनी जन सुरक्षा कायदा विरोधी कृती समिती लातूर जिल्ह्याच्या वतीने लातूर येथे महात्मा गांधी चौकात सकाळी ११ ते सायं. ४ वाजेपर्यंत धरणे सत्याग्रह आंदोलन करण्यात आले. या आंदोलनात सहभागी आंदोलकांनी सदर जन सुरक्षा कायद्याच्या विरोधात आक्रमक भाषणे केली. आणि हा घातक कायदा लागू करणाऱ्या सरकारचा तीव्र निषेध केला.

या आंदोलनात विविध पक्ष, संघटनाचे पदाधिकारी, कार्यकर्ते व नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. या नव्या व अन्यायी कायद्यामुळे कोणीही सरकारवर टीका करू शकणार नाही, संघटित होऊ शकणार नाही असा हा विचित्र कायदा आहे; राज्य शासनाने कडव्या डाव्या शहरी नक्षलवादाला







संपविण्यासाठी म्हणून आणलेला हा कायदा परिवर्तनवादी चळवळीला क्षीण करणार आहे. हा कायदा लागू झाल्यास आपणाला आंदोलने, निषेध, मोर्चे करता येणार नाहीत. आपल्यावर एक प्रकारची गुलामी लादली जाणार आहे. या गुलामीतून मुक्त होण्यासाठी आपण या कायद्याला विरोध करून हा कायदा रद्द झाला पाहिजे. यासाठी सर्व परिवर्तनवादी संघटना, सर्व दलित संघटना, पुरोगामी संघटना, विचारवंत, लेखक, साहित्यिक व पत्रकार यांनी सर्व ताकदीनिशी या आंदोलनाच्या माध्यमातून विरोध केला. या धरणे आंदोलन सत्याग्रहत राजकुमार होळीकर, प्रा. सुधीर अनवले, प्राचार्य सोमनाथ रोडे, प्रा. अर्जुन जाधव, शिवाजीराव शिंदे, बसवंतअप्पा उबाळे, शिवाजीराव नरहरे, समीर पडवळ, ॲड. उदय गवारे, मोहसीन खान, शेख शफी, रामराजे आत्राम, यू. डी. गायकवाड, प्राचार्य श्रीकांत गायकवाड, वाजीद मणियार, प्रकाश घादगीने, रामराव गवळी, प्रा. रब्बानी शेख, दगडू पडिले, माधव गादेकर, राष्ट्र सेवा दलाचे पांडुरंग देडे, शिवाजी कांबळे, नागनाथ डोंगरे, मोहन कांबळे, शेख युसूफ, ॲड. सोमेश्वर वाघमारे गौतम जेवरीकर, अनिल ताकतोडे, सुरेश काळे, अंकुश टकळगे, चंद्रपाल गिरी, अनिल कांबळे, अशोक शिंदे, नीलकंठ बिरादार, आदिसह मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते.

# मनावर घेतलं तर निश्चितपणे बदल घडू शकतो हे रमेशआप्पांच्या माध्यमातून जनतेने दाखवून दिले

## मुख्यमंत्री समृद्ध पंचायत अभियान शुभारंभ प्रसंगी पालकमंत्री ना. शिवेंद्रसिंहराजे भोसले

लातूर :- कोणतेही अभियान राबवण्याची ताकद जनतेत आहे मनावर घेतले तर बदल घडू शकतो हे जनतेनी रमेशआप्पांच्या माध्यमातून पंधरा वर्षाचा बदल घडून दाखवला तेव्हा गावच्या सर्वांगीण विकासासाठी आणि प्रगतीसाठी मुख्यमंत्री समृद्ध पंचायत अभियान यशस्वीपणे राबवून निवळी ग्रामस्थांनी पहिल्या क्रमांकाचे पाच कोटींचे बक्षीस जिंकण्याचे लक्ष ठेवून प्रयत्न करावेत असे आव्हान जिल्ह्याचे पालकमंत्री ना. शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी केले.

राज्य शासनाच्या वतीने सुरू करण्यात आलेल्या मुख्यमंत्री समृद्ध पंचायत अभियान जिल्हास्तरीय शुभारंभ आणि निवळी येथील नव्याने बांधण्यात आलेल्या ग्रामपंचायत इमारतीचा लोकार्पण सोहळा पालकमंत्री ना. शिवेंद्रसिंहराजे भोसले यांच्या शुभहस्ते लातूर तालुक्यातील मौजे निवळी येथे बुधवारी सकाळी करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी लातूर ग्रामीणचे आमदार श्री रमेशआप्पा कराड होते याप्रसंगी जिल्हाधिकारी श्रीमती वर्षा ठाकूर घुगे, जिपचे मुख्य कार्यकारी अधिकारी राहुलकुमार मीना, जिल्हा पोलीस अधीक्षक अमोल तांबे, मनपा आयुक्त श्रीमती मानसी मीना, उपविभागीय अधिकारी रोहिणी नऱ्हे, तहसीलदार सौदागर तांदळे, गट विकास अधिकारी श्याम गोडभरले यांच्यासह भाजपाचे विक्रमकाका शिंदे, भागवत सोट, नवनाथ भोसले, सतीश आंबेकर, सुरज शिंदे, प्रताप पाटील, विजय काळे, बन्सी भिसे सरपंच अभयकुमार सोनपेठकर यांच्यासह विविध विभागाचे अधिकारी कर्मचारी ग्रामस्थ भाजपाचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

प्रारंभी मुख्यमंत्री समृद्ध पंचायत अभियान या राज्यस्तरीय योजनेचा शुभारंभ छत्रपती संभाजीनगर येथे राज्याचे मुख्यमंत्री ना. देवेंद्रजी फडणवीस यांच्या शुभहस्ते व ग्रामविकास मंत्री ना. जयकुमार गोरे व इतर अनेक मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीत झाला या कार्यक्रमाचे थेट प्रक्षेपण उपस्थितांना दाखवण्यात आले.






आजचा १७ सप्टेंबर हा दिवस अत्यंत अभिमानाचा असून देशाला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर १३ महिन्यांनी निजामाच्या राजवटीतून मराठवाडा विभाग मुक्त झाला. या लढ्यात अनेकांनी बलिदान दिले, त्याग केला, संकट झेलले याची आठवण कायम ठेवली पाहिजे. त्याचबरोबर तिसरी अर्थव्यवस्था निर्माण करून जगात देशाची वेगळी प्रतिमा निर्माण करणारे प्रधानमंत्री श्री. नरेंद्रजी मोदी यांच्या जन्म दिनानिमित्ताने देशाची धुरा कायम त्यांच्याकडे राहावी अशा सदिच्छा देऊन यावेळी बोलताना पालकमंत्री ना. शिवेंद्रसिंह राजे भोसले म्हणाले की, केंद्र आणि राज्य शासनाच्या सर्व योजनांची प्रभावीपणे आणि स्पर्धात्मक अंमलबजावणी व्हावी यासाठी मुख्यमंत्री समृद्ध पंचायत अभियान सुरू करण्यात आले असून या अभियानात सर्वांनी सहभागी व्हावे असे आवाहन केले.

लातूर ग्रामीण मतदार संघाकडे आणि आ. रमेशआप्पा कराड यांच्याकडे मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांचे विशेष लक्ष आहे त्यामुळे या मतदार संघाच्या विकासाला निश्चितपणे गती मिळाल्याशिवाय राहणार नाही. लातूर बार्शी रस्त्याचे काम मुदतीपूर्व पूर्ण करण्याचा प्रयत्न असून सार्वजनिक बांधकाम विभागा अंतर्गत रखडलेले प्रकल्प नजीकच्या काळात शंभर टक्के पूर्णतः घेऊन जाणार असल्याची ग्वाही देऊन पालकमंत्री राजे भोसले म्हणाले की, सर्वत्र प्रचंड पाऊस झाला आहे अतिवृष्टी होऊन नद्या नाल्यांना पूर आले, पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले काही ठिकाणी शेती वाहून गेली घरांची पडझड झाली नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना मदतीचा हात देण्याचे काम निश्चितपणे करू असेही राजे भोसले यांनी बोलून दाखवले.

यावेळी बोलताना लातूर ग्रामीणचे आमदार श्री. रमेशआप्पा कराड म्हणाले की, देशात विकास पुरुष म्हणून नरेंद्र मोदी यांची तर राज्यात लाडके भाऊ म्हणून देवाभाऊजी ओळख निर्माण झाली आहे. केंद्र आणि राज्य शासनाच्या विविध योजना ग्रामीण भागाला दिशा देणाऱ्या असून गावागावात प्रभावीपणे राबवाव्यात. निवळी गावच्या विकासासाठी राज्य शासनाच्या विविध विभागामार्फत निळकंठेश्वर देवस्थान सह विविध विकास कामासाठी मोठ्या प्रमाणात निधी मिळवून दिला असल्याचे सांगून मुख्यमंत्री समृद्ध पंचायत अभियान यशस्वीपणे राबवून स्पर्धेत उतरावे आणि निवळी ग्रामपंचायतीने राज्य पातळीपर्यंत मजल गाठावी. गेल्या काही दिवसापासून होत असलेल्या पावसामुळे शेतीचे प्रचंड नुकसान झाले असून शेतात पाणी घरात पाणी जिकडे तिकडे पाणीच पाणी झाले आहे सर्व शिवार बाधीत झाले असून सरसकट पंचनामे करून शेतकऱ्यांना आधार देण्याचे काम करावे अशी मागणी त्यांनी केली.

जिल्हा परिषदचे मुख्य कार्यकारी अधिकारी राहुलकुमार मीना यांनी अभियान बाबतची सविस्तर माहिती दिली. कार्यक्रमाच्या प्रस्ताविकातून सुरज शिंदे यांनी गावातील विविध विकास कामांची माहिती देऊन अडीअडचणी मांडल्या. सूत्रसंचालन उद्धव फड यांनी केले या कार्यक्रमास निवळी आणि परिसरातील नागरिक ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

PRINTED BY MAHESH MOTIRAM RATHOD, OWNED, PUBLISHED & EDITED BY ASHOK NAMDEVRAO HANWATE, PRINTED AT MAYUR PRINTERS, PLOT No. B-28, MIDC, NEAR BUS STAND 03, LATUR, Tq. & DIST. LATUR - 413512 (M.S.) PULISHED AT : KHADAK HANUMAN, MILIND NAGAR, LATUR TQ. & DIST. LATUR - 413512 (M.S.) EDITOR : ASHOK NAMDEVRAO HANWATE